नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : २९१ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




बुधवार, दि. ०७ ऑक्टोबर २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## थोडक्यात...

### धरणांमध्ये ७४ टक्केच पाणीसाठा

मुंबई (स. गांवकरी) : राज्यातील लघु, मध्यम आणि मोठ्या प्रकल्पांमधील पाणीसाठ्याची स्थिती चिंताजनक बनली असून, सुमारे तीन हजार धरणांमध्ये सध्या केवळ ७४ टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक आहे. गेल्या वर्षी याच दिवशी हा साठा तब्बल ९० टक्के होता. त्यामुळे यंदा गतवर्षीच्या तुलनेत तब्बल १६ टक्के पाणीसाठा कमी आहे. ऑक्टोबरमधील वाढत्या उष्णतेमुळे बाष्पीभवनाचे प्रमाण वाढून उपलब्ध पाणीसाठा आणखी कमी होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत राज्यातील जलसाठ्याच्या सद्यस्थितीचे सादरीकरण करण्यात आले. त्यानुसार राज्यातील ३ हजार ३२ धरणे व प्रकल्पांची एकूण प्रकल्पीय उपयुक्त पाणीसाठा क्षमता १,४४१.१७ टीएमसी असून, ६ ऑक्टोबरपर्यंत प्रत्यक्ष उपलब्ध उपयुक्त पाणीसाठा १,०६८.८७ टीएमसी, म्हणजे ७४ टक्के आहे. गतवर्षी याच दिवशी १,२९०.८९ टीएमसी म्हणजे ९० टक्के पाणीसाठा उपलब्ध होता. गेल्या आठवड्याच्या तुलनेतही राज्याच्या साठ्यात १९.६५ टीएमसीची घट झाली आहे.

### दुष्काळी भागातील शेतकऱ्यांना दिलासा!

मुंबई (स.गांवकरी): राज्यात निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीमध्ये सिंचनासाठी आणि ग्रामीण भागात योग्य दाबाने सुरळीत वीजपुरवठा करण्यासाठी जिल्हा नियोजन व विकास समिती (डीपीडीसी) मधून प्रत्येक जिल्ह्यासाठी तब्बल २० कोटींचा विशेष निधी उपलब्ध करून देण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला आहे. राज्यातील३०२ तालुक्यात दुष्काळी परिस्थिती जाहीर करण्यात आली आहे. दुष्काळी परिस्थितीत वीजे अभावी शेतकऱ्यांची पिके वाया जावू नयेत यासाठी वीज वितरण व्यवस्था सक्षम ठेवण्याठी वितरण रोहित्र( ट्रान्सफॉर्मर), 'स्पेशल डिझाईन ट्रान्सफॉर्मर' आणि 'कॅपॅसिटर बँक' खरेदी करण्यासाठी डीपीडीसीतून प्रत्येक जिल्ह्यासाठी २० कोटी रुपयांपर्यंतचा विशेष निधी उपलब्ध करून देण्याच्या प्रस्तावाला फडणवीस यांनी आज मान्यता दिली. या निर्णयामुळे राज्यातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी आणि ग्रामीण भागात योग्य दाबाने सुरळीत वीजपुरवठा करण्यासाठी वीज वितरण यंत्रणेच्या सक्षमीकरणाचे कामे युद्धपातळीवर सुरु होणार आहे.

### पोलीस कोठडीत मृत्यू झाल्यास ५ लाखांची नुकसानरपाई

मुंबई (स. गांवकरी) : पोलीस कोठडीत एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झाला तर त्यांच्या वारसांना ५ लाखांची नुकसानभरपाई दिली जाणार आहे. संबंधित व्यक्तीच्या जवळच्या वारसदारांना नुकसानभरपाई देण्याबाबतच्या धोरणास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. पोलीस अधिकारी किंवा कर्मचारी यांच्या मारहाण, अत्याचार किंवा दबावामुळे मृत्यू झाल्याचे निष्पन्न झाल्यास जवळच्या वारसदारास ५ लाख रुपये नुकसानभरपाई देण्यात येणार आहे. अशा व्यक्तीस शारीरिक किंवा मानसिक छळामुळे पन्नास टक्क्यांहून कमी कायमस्वरुपी अपंगत्व आल्याचे निष्पन्न झाल्यास दोन लाख आणि त्याहून अधिक प्रमाणात अपंगत्व आल्याचे निष्पन्न झाल्यास चार लाख रुपये नुकसान भरपाई देण्यात येणार आहे. वयोमानानुसार, किंवा कोठडीत येण्यापूर्वीच्या जुन्या असाध्य आजाराने नैसर्गिकरित्या मृत्यू झाल्यास, अचानक उद्भवलेली नैसर्गिक आपत्ती, स्वतःहून वैद्यकीय उपचार घेण्यास नकार दिल्यास, कोठडीतून पलायन करताना अपघात होऊन मृत्यू झाल्यास, अवाजवी मागणीसाठी उपोषण किंवा वैद्यकीय उपचार घेण्यास नकार दिल्याने झालेला मृत्यू या परिस्थितीत ही नुकसान भरपाई दिली जाणार नाही.

# राहुल गांधी, प्रियंका गांधी यांच्यासह प्रमुख नेते दिल्ली पोलिसांच्या ताब्यात

मुंबई : (स. गांवकरी)

निवडणूक प्रक्रियेतील कथित अनियमिततेविरोधात केंद्रीय निवडणूक आयोगाच्या मुख्यालयावर धडक देण्याच्या प्रयत्नात असलेल्या विरोधकांना दिल्ली पोलिसांनी मंगळवारी रात्री ताब्यात घेतले. काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि प्रियांका गांधी-वाड्रा यांच्यासह विरोधकांनी आकाशवाणी भवनाबाहेर तब्बल नऊ तास ठिय्या आंदोलन केले होते. रात्री पोलिसांनी राहुल गांधी, प्रियांका गांधी यांच्यासह विरोधी पक्षांच्या अनेक खासदारांना ताब्यात घेत विविध पोलीस ठाण्यांमध्ये हलवले.

कथित 'एसआयआर' अनियमिततेच्या मुद्द्यावरून मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या भेटीची मागणी विरोधक करत होते. मंगळवारी सकाळपासूनच विरोधी पक्षांचे नेते आणि खासदार निवडणूक आयोगाच्या कार्यालयाच्या दिशेने कूच करत असताना पोलिसांनी त्यांना आकाशवाणी भवनाजवळ बॅरिकेड्स लावून रोखले. यावेळी संतप्त नेत्यांनी बॅरिकेड्सवर चढून घोषणाबाजी केली. मुख्य निवडणूक आयुक्तांना भेटून त्यांनी कशी 'मते चोरली' हे प्रत्यक्ष सांगणार नाही, तोपर्यंत माघार घेणार नाही, असा पवित्रा विरोधी नेत्यांनी घेतला होता. आंदोलनाची तीव्रता वाढल्यानंतर

### ९ तासांच्या ठिय्या आंदोलनानंतर कारवाई



राहुल गांधी आणि प्रियांका गांधी काही समर्थकांसह आकाशवाणी भवनाच्या आवारात शिरले. काँग्रेसचे माध्यम विभागाचे प्रमुख पवन खेरा यांच्यासह अनेक कार्यकर्तेही रात्रीपर्यंत तेथे उपस्थित होते. अखेर रात्री पोलिसांनी कारवाई करत समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव, तृणमूल काँग्रेसचे खासदार अभिषेक बॅनर्जी, कल्याण बॅनर्जी, डेरेक ओ'ब्रायन, इम्रान मसूद, पी. संतोष आणि ए. रहीम यांच्यासह अनेक खासदारांना बसमधून विविध पोलीस ठाण्यांत नेले. आकाशवाणी भवनाच्या आवारातून पत्रकारांशी बोलताना राहुल गांधी यांनी केंद्र सरकार आणि निवडणूक आयोगावर थेट टीका केली. "भाजपा काय म्हणते यात मला रस नाही; आम्ही केवळ त्यांना विरोध करत नसून देशातील लोकशाही वाचवण्यासाठी उभे आहोत," असे राहुल गांधी म्हणाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी मिळून देशातील लोकशाही संपुष्टात आणली असल्याचा गंभीर आरोप राहुल गांधी यांनी केला. "देशातील तरुणांना आता हे सर्व उमगले आहे. त्यांनी उघडपणे मतचोरी करून निवडणुका हायजॅक केल्या आहेत," असा दावाही गांधी यांनी यावेळी केला.

### सर्व काही लक्षात ठेवले जाईल

राहुल गांधी यांना पोलिसांनी ताब्यात घेतानाचा एक व्हिडीओ काँग्रेसच्या एक्स खात्यावर शेअर करण्यात आला आहे. या व्हिडीओवरील कॅप्शनमध्ये 'सर्व काही लक्षात ठेवले जाईल' असे कॅप्शन लिहिण्यात आले आहे.

# रासायनिकरित्या पिकवलेली १,४०० किलो केळीचा साठा जप्त

मुंबई : (स. गांवकरी)

अन्न व औषध प्रशासनाच्या आयुक्तपदी तुकाराम मुंढेंची नियुक्ती झाल्यापासून दररोज महाराष्ट्रात ठिकठिकाणी कारवाई केल्याच्या बातम्या समोर येत असतात. आजही अन्नसुरक्षा नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्यात आली. या कारवाईत आठ खाद्यगृहांचे परवाने निलंबित करण्यात आले. तर रासायनिक पद्धतीने पिकवलेल्या १,३९४ किलो केळीचा साठा जप्त करण्यात आला. तसेच प्रतिबंधित गुटखा आणि भेसळयुक्त दूधही जप्त करण्यात आले आहे, अशी माहिती अन्न व औषध प्रशासनाच्या एका अधिकाऱ्याने इंडिया टुडेला दिली.

अन्न व औषध प्रशासनाने नियम मोडल्याच्या कारणास्तव ११ आस्थापनांवर कारवाई केली. आठ खाद्यगृहांचे परवाने आणि इतर तीन खाद्यगृहांचे नोंदणी प्रमाणपत्रे निलंबित करण्यात आली.

मुंबई विभागात ज्या ११ उपाहारगृहांवर कारवाई झाली, त्यापैकी पाच पश्चिम



उपनगरात आणि सहा दक्षिण मुंबईतील आहेत, अशी माहिती समोर येत आहे. याचबरोबर विले पार्लेमधील आरएन कुपर महानगरपालिकेच्या रुग्णालयातील कँटीनमध्ये अस्वच्छता, माश्या आणि झुरळे आढळून आली. तसेच कच्चे आणि शिजवलेले अन्न वेगळे न ठेवल्याचे आढळले.

### रासायनिक पद्धतीने पिकवल्याबद्दल गुन्हा

इंडिया टुडेने दिलेल्या बातमीनुसार, एका फळविक्रेत्याने इथिफॉनच्या द्रावणात केळी बुडवत असल्याचे लक्षात आल्यानंतर त्याच्याविरोधात नवी मुंबईतील एपीएमसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. इथिफॉन हे एक रसायन असून त्यामुळे वनस्पतींची वाढ होते, मात्र त्याचा वापर केल्यास धोकादायक रासायनिक अवशेष मागे राहतात. या कारवाईतून ६७,८१४ रुपये किमतीची १,३९४ किलो केळी जप्त करण्यात आली.

# सामजिक न्याय विभागाच्या वसतीगृह अनुदानामध्ये वाढ

मुंबई : (स. गांवकरी)

अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील शासकीय वसतिगृहासाठी पात्र असूनही वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेता यावे, यासाठी राबविण्यात येणाऱ्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेच्या वार्षिक अनुदानात वाढ केली आहे. या योजनेअंतर्गत इयत्ता ११ वी व १२ वी तसेच इयत्ता १२ वी नंतरच्या व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांना विविध महाविद्यालये व शिक्षण संस्थांमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना भोजन, निवास, निर्वाह आणि शैक्षणिक साहित्याच्या खर्चासाठी आर्थिक सहाय्य दिले जाते.

असे आहेत सुधारित दर:

1) मेट्रो शहरे : मुंबई शहर, मुंबई उपनगर, पुणे, पिंपरी चिंचवड, नवी मुंबई, ठाणे आणि नागपूर येथे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना आता एकूण ८० हजार रुपये वार्षिक अनुदान मिळणार आहे. यामध्ये भोजन भत्यासाठी ४२ हजार रुपये, निवास भत्त्यासाठी २८ हजार रुपये आणि निर्वाह भत्त्यासाठी १० हजार रुपये यांचा समावेश आहे. 2) इतर महसूल विभागीय शहर: 'क' वर्ग महानगरपालिका क्षेत्रात उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी एकूण ६८ हजार रुपये वार्षिक अनुदान देण्यात येईल. यामध्ये भोजन भत्ता ३७ हजार रुपये, निवास भत्ता २१ हजार रुपये आणि निर्वाह भत्ता १० हजार रुपये असेल. 3) जिल्ह्यांच्या ठिकाणी : तसेच महानगरपालिकेच्या हद्दीपासून ५ किलोमीटर परिसरातील महाविद्यालये व शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना एकूण ५७ हजार रुपये वार्षिक अनुदान मिळेल. यामध्ये भोजन भत्ता ३२ हजार रुपये, निवास भत्ता १७ हजार रुपये आणि निर्वाह भत्ता ८ हजार रुपये असेल.

# महिला अधिकाऱ्याचे भाजपा नेत्याला रोखठोक उत्तर

मुंबई : (स. गांवकरी)

विरोधक आणि पोलीस प्रशासन यांच्यात अनेकदा खटके उडाल्याचे पाहायला मिळते. मात्र उत्तर प्रदेशच्या सीतापूर जिल्ह्यात भाजपा नेत्याशी पोलीस अधिकाऱ्यामध्ये जोरदार शाब्दिक वाद झाल्याचे समोर आले आहे. रुग्णालयासमोर वारंवार वाहतूक कोंडी होत असल्याची तक्रार घेऊन सीतापूरचे भाजपा जिल्हाध्यक्ष राजेश शुक्ला पोलीस ठाण्यात गेले. मात्र पोलीस अधिकारी स्वाती चतुर्वेदी यांच्याबरोबर त्यांचा वाद झाला.

या घटनेचा व्हिडीओ आता सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. राजेश शुक्ला पोलीस ठाण्यात तावातावाने जातात आणि म्हणतात, "स्वातीजी, रुग्णालयाच्या गेटच्या बाहेर वाहतूक कोंडी झाली आहे. चालायलाही जागा नाही. काही ठिकाणी रुग्णवाहिका रस्त्यात अडकल्या आहेत."

पोलिसांना जाब विचारत असताना शुक्ला यांच्याकडून व्हिडीओ रेकॉर्डिंगही केले जात होते. यावर वैतागलेल्या पोलीस



अधिकारी स्वाती चतुर्वेदी म्हणाल्या की, तुम्ही माझा व्हिडीओ काढत आहात. तुम्ही जा आणि मला निलंबित करा. यापेक्षा अधिक तुम्ही काही करू शकत नाही. या विधानावर शुक्ला यांनी आक्षेप घेतला. ते म्हणाले, मी तुमचा व्हिडीओ का काढू? मी फक्त अडचण सांगण्याचा प्रयत्न करत आहे. ती सोडवणे हे तुमचे कामच आहे.

यावर स्वाती चतुर्वेदी पुन्हा संतापल्या. त्या म्हणाल्या, माझी पोस्टमॉर्टम ड्युटी लावली आहे. तुम्हाला याची माहिती ठाणेप्रमुखाला द्यावी लागेल. हे माझे काम नाही. अर्धा तास चाललेल्या वादावादीनंतर भाजपाचे जिल्हाध्यक्ष तिथून निघून गेले. यानंतर त्यांनी सीतापूरच्या जिल्हा पोलीस अधीक्षक अंकुर अग्रवाल यांना याबाबतची माहिती दिली. यानंतर रात्री उशीरा चतुर्वेदी यांची रुग्णालयाबाहेरील पोलीस चौकीतून उचलबांगडी करण्यात आली. शहरातील रुग्णालयाच्या समोर नेहमीच वाहतूक कोंडी असते, अशी तक्रार अनेकदा करण्यात आली होती. ई-रिक्षाची संख्या वाढल्यामुळे रुग्णवाहिकेलाही रुग्णालयात जाता येत नव्हते. वॉर्ड बॉयना रुग्ण अंगावर उचलून घेऊन जावे लागत होते. यामुळे रुग्णांचे मोठे हाल होत होते.

दरम्यान समाजवादी पक्षाने या घटनेवर टीका केली आहे. महिला शक्तीबाबत बोलणाऱ्या भाजपाने एका कर्तव्यनिष्ठ महिला अधिकाऱ्याला न्याय द्यावा. स्वाती चतुर्वेदी यांची अचानक बदली का करण्यात आली. याची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी समाजवादीच्या नेत्याने केली.

वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी कुणीही पोलीस तिथे उपस्थित नव्हते.

अर्चना शुक्ला नावाच्या स्थानिक रहिवाशाने आपल्या मुलीला घेऊन रुग्णालयात औषध घेण्यासाठी आल्या होत्या. मात्र चोरट्यांनी त्यांच्या गळ्यातील सोन्याची चैन पळवली. यानंतर त्यांनी रुग्णालयाबाहेर असलेल्या पोलीस चौकीत जाऊन तक्रार देण्याचा प्रयत्न केला. मात्र स्वाती चतुर्वेदी यांनी त्यांची तक्रार नोंदवून घेण्यास नकार देत, त्यांना पोलीस ठाण्यात जाण्याचा सल्ला दिला.

# अहिल्यानगर जिल्हा बँक निवडणुकीत आज आक्षेपांची छाननी

## १४ हरकतींवर होणार निर्णय; सकाळपासूनच निवडणूक कार्यालय परिसरात कार्यकर्त्यांची गर्दी; राजकीय समीकरणांकडे जिल्ह्याचे लक्ष

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीची प्रक्रिया आता निर्णायक टप्प्यावर पोहोचली असून, उमेदवारी अर्जांवर प्राप्त झालेल्या हरकतींची आज, मंगळवारी (६ ऑक्टोबर) छाननी करण्यात येणार आहे. एकूण १४ हरकती प्राप्त झाल्या असून, त्यावर आज सकाळी ११ वाजता सुनावणी घेऊन अंतिम निर्णय जाहीर केला जाणार असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी मंगेश सुरवसे यांनी दिली.

उमेदवारी अर्ज दाखल झाल्यानंतर विविध मतदारसंघांतील अर्जांवर आक्षेप नोंदविण्यात आले आहेत. त्यामुळे आज होणाऱ्या छाननी प्रक्रियेकडे इच्छुक उमेदवारांसह जिल्ह्यातील राजकीय नेत्यांचे आणि कार्यकर्त्यांचे लक्ष लागले आहे. कोणत्या उमेदवारांचे अर्ज वैध ठरतात आणि कोणाच्या उमेदवारीवर गंडांतर येते, यावर आगामी निवडणुकीतील राजकीय गणिते मोठ्या प्रमाणात अवलंबून राहणार आहेत. तर इतर मतदारसंघांमध्ये एकूण पाच हरकती प्राप्त झाल्या आहेत. त्यामध्ये बिगर शेती मतदारसंघातील दोन, अनुसूचित जाती-जमाती मतदारसंघातील एक, महिला राखीव मतदारसंघातील एक आणि इतर मागासवर्गीय मतदारसंघातील एका हरकतीचा समावेश आहे. आज सकाळपासूनच अहिल्यानगर जिल्ह्याच्या ग्रामीण भागातून विविध राजकीय गटांचे कार्यकर्ते आणि उमेदवारांचे समर्थक निवडणूक कार्यालय परिसरात दाखल होऊ लागले आहेत. आक्षेप छाननीच्या प्रक्रियेदरम्यान कोणता निर्णय होतो, याची उत्सुकता सर्वांनाच लागली आहे.

छाननीनंतर निवडणुकीचे चित्र अधिक स्पष्ट होणार असून, त्यानंतर विविध राजकीय गटांकडून पुढील रणनीती निश्चित केली जाण्याची शक्यता आहे.

### दिग्गजांच्या उमेदवारीकडे लक्ष

अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत जिल्ह्यातील अनेक दिग्गज नेत्यांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. बँकेचे माजी अध्यक्ष चंद्रशेखर घुले, माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील आणि माजी आमदार शंकरराव गडाख यांच्यासाठी निवडणुकीतील पुढील घडामोडी महत्त्वाच्या मानल्या जात आहेत.

दरम्यान, प्रा. राम शिंदे यांनी निवडणूक रिंगणातून माघार घेतल्याने काही राजकीय समीकरणांवर परिणाम झाल्याची चर्चा जिल्ह्यात सुरू आहे. त्यांच्या माघारीमुळे काही इच्छुकांच्या राजकीय गणितांना धक्का बसल्याचे बोलले जात आहे. दुसरीकडे खासदार डॉ. निलेश लंके, माजी खासदार सदाशिव लोखंडे, खासदार भाऊसाहेब वाकचौरे, आमदार विठ्ठलराव लंघे आणि आमदार अमोल खताळ यांची भूमिका आगामी निवडणुकीत महत्त्वाची ठरणार आहे. या नेत्यांकडून कोणत्या गटाला पाठिंबा दिला जातो, यावर अनेक मतदारसंघांतील विजयाचे गणित बदलण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### विकास संस्था मतदारसंघात सर्वाधिक हरकती

प्राप्त झालेल्या १४ हरकतींपैकी ९ हरकती विकास संस्था मतदारसंघातील आहेत. यामध्ये संगमनेरमधून एक, पाथर्डीतून एक, राहाता येथून दोन, कोपरगाव येथून दोन, अकोले येथून एक आणि श्रीगोंदा येथून दोन हरकती दाखल झाल्या आहेत.

### आजच्या निर्णयानंतर चित्र स्पष्ट होणार

आक्षेप छाननीनंतर वैध आणि अवैध उमेदवारी अर्जांचे चित्र स्पष्ट होईल. त्यानंतर निवडणुकीच्या प्रत्यक्ष लढतीचे स्वरूप समोर येणार आहे. त्यामुळे आज सकाळी ११ वाजता होणारी छाननी प्रक्रिया ही केवळ प्रशासकीय बाब न राहता जिल्ह्यातील आगामी राजकीय समीकरणांना दिशा देणारी ठरण्याची शक्यता आहे. १४ हरकतींवर निवडणूक निर्णय अधिकारी कोणता निर्णय देतात, कोणाचे अर्ज कायम राहतात आणि कोणाच्या उमेदवारीवर आक्षेप ग्राह्य धरला जातो, याकडे संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# आणखी १८ तालुक्यात दुष्काळ जाहीर; शेतकऱ्यांना मदत देणार

मुंबई : (स. गांवकरी)

राज्यात १० टक्के पाणी कपातीची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी तसेच दुष्काळी भागात रोजगार हमी योजनेतील कामे वाढवावीत असे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी मंत्रिमंडळ बैठकीत दिले. दुसरीकडे राज्यात दुष्काळाची व्याप्ती वाढू लागली असून आणखी १८ तालुक्यात दुष्काळी परिस्थिती जाहीर करण्याचा निर्णय मंगळवारी दुष्काळ निवारण उपाययोजना मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत घेण्यात आला. त्यामुळे राज्यातील दुष्काळी तालुक्यांची संख्या आता ३०२ झाली आहे. दुष्काळी परिस्थिती जाहीर झालेल्या तालुक्यातील पंचनामे २० ऑक्टोबर पूर्वी पूर्ण करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांना आदेश देण्यात आले असून बाधित शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी मदत करण्याचे नियोजन करण्याचेही समितीने प्रशासनास दिले. राज्य मंत्रिमंडळ बैठकीत राज्यातील दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्यात आला. यावेळी राज्यातील २६५ तालुक्यातील ३२ हजार ८२३ गावांपैकी १७ हजार ९४१ गावातील ३८ लाख १७ हजार हेक्टर क्षेत्रावरील नुकसानीचे पंचनामे करण्यात आल्याची माहिती देण्यात आली. त्याचप्रमाणे आणखी काही तालुक्यांमध्ये



दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्याची माहिती मंत्रिमंडळास देण्यात आली. त्यावेळी पाण्याचे नियोजन आतापासूनच करा, १० टक्के पाणी कपातीची राज्यभरात काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले. त्यानुसार शहरी व ग्रामीण भागात १० टक्के पाणीकपात लागू करण्यासोबतच, शेतकऱ्यांना कर्जवसुलीसाठी त्रास देणाऱ्या बँकांवर कारवाई करणे, चाऱ्याची टंचाई दूर करणे आणि दिवाळीपूर्वी मदत वाटपाचे नियोजन करण्याबाबत अनेक महत्त्वपूर्ण निर्णय दुष्काळ निवारण उपाययोजना मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली संध्याकाळी झालेल्या बैठकीत घेण्यात आले.

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक समर्थ गांवकरी
संपादकीय



डॉ. विश्वासराव आरोटे
संपादक - दै. समर्थ गांवकरी

# मुलांना योग्य सवयी लागणे गरजेचे

**मुलं म्हणजे देशाचे भविष्य. आजची लहान मुलं उद्याच्या समाजाची आणि राष्ट्राची दिशा ठरवणार आहेत. त्यामुळे मुलांना केवळ चांगले शिक्षण देणे पुरेसे नाही, तर त्यांच्यामध्ये योग्य सवयी, शिस्त, संस्कार आणि जबाबदारीची भावना रुजवणे तितकेच आवश्यक आहे. बालपणी लागलेल्या सवयी आयुष्यभर माणसाच्या व्यक्तिमत्त्वावर प्रभाव टाकतात.**

आजच्या बदलत्या जीवनशैलीत मुलांचा बराच वेळ दूरचित्रवाणी, भ्रमणध्वनी, संगणक आणि विविध मनोरंजनाच्या साधनांमध्ये जात आहे. तंत्रज्ञानाचा योग्य वापर निश्चितच उपयुक्त आहे; मात्र त्याचा अतिरेक मुलांच्या शारीरिक आणि मानसिक विकासासाठी घातक ठरू शकतो. त्यामुळे वेळेचे नियोजन, नियमित अभ्यास, खेळ, वाचन, पुरेशी झोप आणि कुटुंबीयांशी संवाद या सवयी मुलांमध्ये लहानपणापासूनच रुजवणे गरजेचे आहे.

मुलांनी सकाळी लवकर उठणे, स्वतःची कामे स्वतः करणे, स्वच्छता राखणे, वेळेवर जेवणे, नियमित व्यायाम किंवा खेळ करणे आणि अभ्यासासाठी ठराविक वेळ देणे या साध्या सवयी आत्मसात केल्या पाहिजेत. त्याचबरोबर मोठ्यांचा आदर करणे, लहानांशी प्रेमाने वागणे, गरजू व्यक्तीला मदत करणे, खोटे न बोलणे आणि चूक झाल्यास ती मान्य करण्याचे धैर्य ठेवणे, हे संस्कारही तितकेच महत्त्वाचे आहेत.

मुलांना सवयी लावताना केवळ सूचना देऊन उपयोग होत नाही. पालकांनी स्वतः आदर्श निर्माण करणे आवश्यक आहे. पालक सतत भ्रमणध्वनीमध्ये व्यस्त असतील आणि मुलांना भ्रमणध्वनीपासून दूर राहण्याचा सल्ला देत असतील, तर त्याचा परिणाम होणार नाही. मुलं ऐकण्यापेक्षा पाहून अधिक शिकतात. त्यामुळे घरातील वातावरण हेच त्यांचे पहिले संस्कारकेंद्र असते.

शिक्षकांची भूमिकाही महत्त्वाची आहे. शाळेत केवळ अभ्यासक्रम पूर्ण करण्यापेक्षा विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासावर भर दिला पाहिजे. शिस्त, वेळेचे महत्त्व, सहकार्य, संघभावना, पर्यावरणाची काळजी आणि सामाजिक जबाबदारी यांचे धडे प्रत्यक्ष कृतीतून दिले गेले, तर त्याचा मुलांच्या मनावर कायमस्वरूपी परिणाम होतो.

मुलांवर अपेक्षांचे ओझे टाकताना पालकांनी त्यांच्या भावनांचाही विचार केला पाहिजे. प्रत्येक मुलाची क्षमता वेगळी असते. गुणांपेक्षा प्रयत्नांचे कौतुक करणे, अपयश आले तर धीर देणे आणि संवादातून समस्या समजून घेणे आवश्यक आहे. सतत तुलना आणि दबावामुळे मुलांमध्ये न्यूनगंड निर्माण होऊ शकतो.

आज मुलांना चांगल्या सवयी लावणे ही केवळ पालकांची जबाबदारी राहिलेली नाही. कुटुंब, शाळा आणि समाज या तिन्ही घटकांनी एकत्रितपणे प्रयत्न करण्याची गरज आहे. मुलांच्या हातात उद्याचा समाज आहे. त्यांच्या मनात चांगले विचार, कृतीत शिस्त आणि वागण्यात माणुसकी रुजवली, तर भविष्यात अधिक संवेदनशील, जबाबदार आणि सक्षम पिढी घडेल. मुलांना महागड्या वस्तूंपेक्षा चांगल्या सवयींची श्रीमंती द्या; कारण हीच श्रीमंती त्यांच्या संपूर्ण आयुष्याची खरी संपत्ती ठरणार आहे.

# थोडक्यात पण महत्वाचे



## साबेगाव व डी.जे. कॉम्प्लेक्स परिसरातील पाणीटंचाई दूर होणार !

ठाणे (स. गांवकरी) : दिव्यातील साबेगाव व डी.जे. कॉम्प्लेक्स परिसरातील नागरिकांना भेडसावणाऱ्या पाणीटंचाईची समस्या लवकरच दूर होण्याची शक्यता आहे. काही दिवसांपूर्वी ठाणे महानगरपालिकेच्या पाणी विभागाने अनधिकृत नळजोडण्यांविरोधात धडक कारवाई केली होती. त्यानंतर आता अधिकृत ग्राहकांना नवीन नळजोडण्या देण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे. पाणीबिल भरणारे, जुने अधिकृत ग्राहक तसेच मालमत्ता कर भरणाऱ्या नागरिकांना नियमानुसार नवीन जोडण्या उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.परिसरातील पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी १० इंची नवीन पाण्याची पाइपलाइन टाकण्यात येणार असून, त्यातून ४ इंची दोन उपशाखा काढून विविध भागात पाणीपुरवठा करण्यात येणार आहे. त्यामुळे साबेगाव आणि डी.जे. कॉम्प्लेक्स परिसरातील कमी दाबाने होणारा तसेच अपुरा पाणीपुरवठा सुधारण्यास मदत होणार असून नागरिकांची पाणीटंचाईची समस्या मोठ्या प्रमाणात दूर होण्याची अपेक्षा आहे. ठाणे महानगरपालिकेचे कार्यकारी अभियंता साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली उपकार्यकारी अभियंता सुरेश वाघीरे तसेच वसुली अधिकारी भोईर यांनी या कामासाठी पुढाकार घेतला आहे. स्थानिक रहिवाशांसह प्रभाग क्रमांक २७ चे नगरसेवक शैलेश पाटील, आदेश भगत, अमर पाटील, नगरसेविका दीपाली भगत, अर्चना निलेश पाटील तसेच विभागप्रमुख निलेश पाटील यांनीही पाणीटंचाई दूर करण्यासाठी पाठपुरावा केला आहे.



## जनविकास फाउंडेशनच्या दिवा शहर नवीन कार्यकारिणीची जाहीर

ठाणे (स. गांवकरी) : जनविकास फाउंडेशन, महाराष्ट्र राज्य – दिवा शहर यांच्या वतीने संस्थेच्या नवीन कार्यकारिणीची स्थापना करण्यात आली. संस्थापक अध्यक्ष जयसिंग विठ्ठल कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निलेश पाटणे यांनी केले, तर प्रवीण उतेकर यांनी प्रास्ताविक केले. यावेळी संस्थापक अध्यक्ष कांबळे यांनी उपस्थित पदाधिकारी व सदस्यांना संस्थेच्या आगामी सामाजिक वाटचालीबाबत मार्गदर्शन केले. नवीन कार्यकारिणीत प्रवीण केशव उतेकर यांची कार्याध्यक्ष, निलेश शांताराम पाटणे यांची सचिव, तर बबन रमेश सपकाळ व अनिता मयूर पवार यांची उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. तसेच संचिता पवार व रोहित हेमंत भायजे यांच्यावर सहसचिवपदाची जबाबदारी देण्यात आली. याशिवाय खजिनदार, उपखजिनदार, संपर्कप्रमुख, महिला संपर्कप्रमुख, संघटक, प्रवक्ते, हिशोब तपासणीस, युवा संपर्कप्रमुख व विविध विभागांच्या संघटकांची नियुक्ती करण्यात आली. नवीन पदाधिकाऱ्यांचे यावेळी अभिनंदन करून त्यांना पुढील सामाजिक कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. जनविकास फाउंडेशनने २०१७ पासून सामाजिक कार्याला सुरुवात केली असून संस्थेने आपल्या सामाजिक प्रवासाच्या दहाव्या वर्षात पदार्पण केले आहे. समाजातील विविध घटकांच्या समस्या, नागरिकांचे न्याय व हक्क तसेच समाजहिताच्या विविध प्रश्नांसाठी संस्था सातत्याने कार्यरत आहे. आता दिवा शहरापुरते कार्य मर्यादित न ठेवता महाराष्ट्रभर सामाजिक कार्याचा विस्तार करण्याचा संकल्प संस्थेने केला आहे. "जनसेवा हीच खरी समाजसेवा आणि जनसेवेतूनच जनविकास" या विचाराने फाउंडेशनची पुढील वाटचाल सुरू राहणार असल्याचे संस्थापक अध्यक्ष जयसिंग कांबळे यांनी सांगितले.




## दिव्यात फेरीवाले कारवाई प्रसंगी सहायक आयुक्त ॲक्शन मोडवर

ठाणे (स. गांवकरी) : दिवा शहरातील प्रमुख रस्ते आणि पदपथांवर वाढलेल्या अनधिकृत फेरीवाल्यांच्या अतिक्रमणाविरोधात अखेर ठाणे महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाने कारवाईला सुरुवात केली आहे. वंचित बहुजन आघाडीचे विकास प्रकाश इंगळे यांनी मनपा प्रशासनाकडे निवेदन देऊन अतिक्रमणांवर ठोस कारवाई करण्याची मागणी केली होती. त्यानंतर प्रशासनाच्या हालचालींना वेग आल्याचे दिसून येत आहे. दिवा रेल्वे स्थानक परिसर, मुंब्रादेवी कॉलनी रोड, रिलायन्स टॉवर, फलाट क्र ८ चा परिसर, दिवा–आगासन रोड तसेच शहरातील प्रमुख रस्ते व पदपथांवर मोठ्या प्रमाणात फेरीवाल्यांचे अतिक्रमणामुळे ठाणे महानगरपालिकेचे दिवा प्रभाग समितीचे सहायक आयुक्त प्रवीणकुमार फड स्वतः काल कारवाई प्रसंगी रस्त्यावर उतरले होते. पादचाऱ्यांना रस्त्यावरून चालणे कठीण झाले असून वाहतूक कोंडी आणि नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर मनपा अतिक्रमण विभागाने अनधिकृत फेरीवाल्यांवर कारवाई करत रस्ते व पदपथ मोकळे करण्यास सुरुवात केली आहे.

# शिक्षक पालक संघ व माता पालक संघ मेळावा संपन्न



आळेफाटा : (स. गांवकरी)

शिवांजली विद्यालयात शिक्षक पालक संघ व माता पालक संघ मेळाव्याचे आयोजन करण्यात आले.घटक चाचणी क्रमांक एक च्या निकालाचे वाचन इयत्ता पाचवी ते दहावीच्या वर्ग शिक्षकांनी केले. प्रत्येक वर्गातील प्रथम तीन क्रमांकाच्या विद्यार्थ्यांची माहिती वर्ग शिक्षकांनी दिली. परीक्षेला बसलेले एकूण विद्यार्थी आणि पात्र झालेले विद्यार्थ्यांची माहिती देण्यात आली. परीक्षा विभाग प्रमुख श्री. संतोष चव्हाण यांनी परीक्षेविषयी मार्गदर्शन केले. शालेय शिस्तीच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांनी मोबाईलचा वापर टाळावा याविषयी पालकांनी आपली मते मांडली व चर्चा करण्यात आली. शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी विद्यार्थ्यांनी दिलेला अभ्यास वेळेवर पूर्ण करावा, ज्यादा तासिकांना वेळेवर उपस्थित राहावे. पालकांनी सुद्धा आपला पाल्य घरी असताना अभ्यासाकडे लक्ष द्यावे. शालेय पोषण आहारासाठी पालकांनी आपल्या शेतात उपलब्ध असलेल्या पालेभाज्या शालेय पोषण आहारासाठी द्याव्यात अशी पालकांना विनंती करण्यात आली. बरेच विद्यार्थी अनेक कारणे सांगून गैरहजर राहतात. विद्यार्थ्यांनी रोज शाळेत उपस्थित राहावे त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळता येईल व विद्यार्थ्यांची शाळेतील उपस्थिती वाढेल. मंथन परीक्षा, नवोदय परीक्षा इयत्ता पाचवी या परीक्षांचे ज्यादा तासिका घेऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे असे सुचित करण्यात आले. विद्यालयाचे मुख्याध्यापक भानुदास चासकर, उपस्थित पालक, शिक्षक या सर्वांमध्ये वरील विषयांवर चर्चा करण्यात आली. यावेळी जुन्नर येथील वन्यजीव निसर्ग संवर्धन रेस्क्यू टीमचे श्री. आकाश माळी व श्री. दीपक माळी यांचा सन्मान करण्यात आला. तसेच तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेमध्ये १०० मीटर धावणे या प्रकारात तृतीय क्रमांक मिळवलेली विद्यार्थीनी कुमारी निशा राजू बर्डे इयत्ता सातवी हिचा मान्यवरांच्या शुभहस्ते सन्मान करण्यात आला.

# आळंदीत इंदिरा एकादशी दिनी भाविकांची दर्शनास गर्दी

- श्रींचे गाभाऱ्यात पुष्प सजावट लक्षवेधी
- इंद्रायणी आरतीस महिला भाविकांचा प्रतिसाद



आळंदी : (स. गांवकरी)

येथील इंदिरा एकादशी दिनी माऊली मंदिरात भाविकांनी श्रींचे दर्शनास गर्दी केली. परंपरेने विविध धार्मिक कार्यक्रमांतुन मंदिरात इंदिरा एकादशी उत्साहात साजरी करण्यात आली.

लाखावर भाविकांनी श्रींचे दर्शनास गर्दी केली. एकादशी दिनी मंदिर आणि नगरप्रदक्षिणा करीत भाविकांनी हरिनाम गजरात श्रींचे दर्शन घेतले. मंदिरात लक्षवेधी पुष्प सजावटीने श्रींचे रूप लक्षवेधी दिसत होते. आळंदी ग्रामस्थ व महिला भाविकांची इंद्रायणी आरतीस मोठी गर्दी झाली होती.

आळंदी मंदिरात भाविकांनी एकादशीस गर्दी करीत श्रींचे दर्शन घेतले. एकादशी दिनी श्रींचे मंदिरात पहाटे वेदमंत्र जयघोषात पवमान अभिषेक करण्यात आल्याचे आळंदी देवस्थांनचे व्यवस्थापक माऊली वीर यांनी सांगितले. भाविकांना श्रींचे मंदिर दर्शनास कमी वेळेत जास्त भाविकांना दर्शनाची व्यवस्था करण्यात आली होती. भाविकांनी मंदिर परिसरात रांगा लावून दर्शन घेतले. दुपारचा महानैवेद्य, वारकरी शिक्षण संस्थेचे वतीने परंपरेने प्रवचन, कीर्तन, रात्री धुपारती, शेजारती, हरिजागर झाला. श्रींचे दर्शन, प्रदक्षिणा पूर्वी भाविकांनी इंद्रायणी नदी घाटावर स्नानास गर्दी केली. आळंदी मंदिरात भाविकांनी धुपारतीस देखील गर्दी केली. मंदिरात परंपरेने धार्मिक उपचार श्रीची पूजा, आरती, फराळाचा महानैवेद्य आदी धार्मिक कार्यक्रम झाले. भाविकांची कमी वेळेत जास्तीत जास्त भाविकांना दर्शनास सुलभ व्यवस्था व्यवस्थापक माऊली वीर यांचे नियंत्रणात करण्यात आली. यावेळी सुरक्षा रक्षक, सेवक आणि मंदिरातील बंदोबस्ता वरील पोलिसांनी विशेष परिश्रम घेतले. यासाठी आळंदी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक भीमा नरके, वाहतूक पोलीस शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विनोद पाटील, पोलीस नाईक मछिंद्र शेंडे आदींनी बंदोबस्ताचे सुरळीत, सुरक्षिततेसाठी नियोजन केले.

आळंदीतील रहदारीची वर्दळ पाहता येथे वाहतुकीचे केलेले प्रभावी नियोजन यामुळे भाविक, नागरिक यांना वाहतुकीचे कोंडीतून राहत मिळाली. आळंदी पोलिसांनी रस्त्यावरील बेकायदेशीर पार्किंग केलेल्या गाडयांवर प्रभावी कारवाई केली. यामुळे आळंदीत नागरिक, व्यापारी, पोलीस मित्र यांनी पोलीस प्रशासनाच्या कार्याचे कौतुक केले.

यावेळी इंद्रायणी आरती सेवा समितीच्या प्रमुख संयोजक अनिताताई झुजम निलम कुरधोंडकर, अनिता शिंदे, सुवर्णाताई काळे, रेखा चव्हाण, सरस्वती भागवत, कौताबाई देवकर, सावित्री घुंडरे, शोभा उबाळे, सुमनबाई सोनवणे, उषा वर्तले, ओम वर्तेले ज्योती यादव, सुरेखा काळभोर, राजेंद्र जाधव, दत्ताराव तोतरे, संयोजक इंद्रायणी आरती सेवा समिती अर्जुन मेदनकर, ज्ञानेश्वर घुंडरे, गोविंद सुरेश तौर, तारामती गोरेउषाताई देसले, ज्योती यादव, पुष्पाताई भगवान लेंडकर, दिनकर तांबे, उषाताई वहिले आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी उपस्थित पाच महिला मान्यवरांचे हस्ते इंद्रायणी नदीचे पूजन औक्षण करून करण्यात आले. दर एकादशी दिनी इंद्रायणी आरती सेवा समितीचे वतीने इंद्रायणी आरती, स्वच्छता, रांगोळी, प्रसाद वाटप होवून पसायदानाने सांगता होते. या उपक्रमात सर्व भाविक, नागरिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन संयोजक अर्जुन मेदनकर, संयोजिका अनिताताई झुजम यांनी केले आहे.

तीर्थक्षेत्र आळंदी ग्रामस्थ इंद्रायणी आरती सेवा समिती, राजमाता जिजाऊ महिला प्रतिष्ठान, आळंदी जनहित फाउंडेशन, आळंदी देवस्थान, महिला बचत गट सदस्य, पदाधिकारी, महिला मंडळ तसेच आळंदी ग्रामस्थ यांचे वतीने इंद्रायणी नदी घाटावर घाट परिसर, स्वच्छता करीत इंद्रायणीची आरती हरिनाम गजरात झाली. एकादशी दिनी इंद्रायणीच्या आरती करून नदी घाट स्वच्छता करीत सामाजिक बांधिलकी जोपासल्याचे राजमाता जिजाऊ महिला प्रतिष्ठान अध्यक्षा अनिता झुजम, अर्जुन मेदनकर यांनी सांगितले. यावेळी महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

आळंदी देवस्थान तर्फे रात्री उशिरा इंद्रायणी आरती वेद मंत्र जयघोषात झाली. यावेळी विश्वस्त ॲड रोहिणी पवार यांच्यासह सेवक, कर्मचारी, सुरक्षा रक्षक, पदाधिकारी, भाविक नागरिक आदी मान्यवर उपस्थित होते.

# आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचा 'उलगुलान' मोर्चा ठाण्यात अडवला

## पोलिसांकडून धक्काबुक्की झाल्याचा आंदोलक विद्यार्थ्यांचा आरोप, काही विद्यार्थ्यांची प्रकृती अस्वस्थ

भिवंडी : (स. गांवकरी)

आदिवासी आश्रमशाळांमधील शिक्षण, भोजन आणि सुरक्षेच्या प्रश्नांवरून मुंबईच्या दिशेने निघालेल्या विद्यार्थ्यांच्या 'उलगुलान मोर्चा'चा आज आठवा दिवस होता. मात्र सोमवारी रात्री दोन वाजताच्या सुमारास खरेगाव ठाणे हद्दीत हा मोर्चा अडवण्यात आला. यावेळी काही विद्यार्थ्यांना पोलिसांनी ताब्यात घेतल्याचा दावा आंदोलक विद्यार्थ्यांनी केला असून, पोलिसांकडून विद्यार्थ्यांसोबत धक्काबुक्की झाल्याने सहा ते सात विद्यार्थ्यांची प्रकृती बिघडल्याचा आरोप देखील आंदोलक विद्यार्थ्यांनी केला आहे. प्रकृती बिघडलेल्या सहा ते सात विद्यार्थ्यांना भिवंडीतील रांजनोली नाका येथील एका खासगी रुग्णालयात सहकारी आंदोलकांनी दाखल केले.तेथे उपचार घेऊन प्रकृती स्थिर झाल्या नंतर या विद्यार्थ्यांना रुग्णालयातून सोडून देण्यात आले आहे.प्रकृती बिघडलेल्या विद्यार्थ्यांमध्ये तीन मुली व तीन ते चार मुले होती. वैष्णवी खिल्लार,वैशाली व संजना या तीन मुलींची प्रकृती बघडली होती तर आंदोलनाचे नेतृत्व करणारा अरुण पावरा व त्याचे इतर दोन ते तीन सहकारी विद्यार्थ्यांची प्रकृती बिघडली होती.मुंबईत आंदोलनाला परवानगी न मिळाल्याने हे आंदोलन स्थगित करण्यात आले असले तरी पोलिसांनी आम्हाला नाहक त्रास दिला असल्याची माहिती आंदोलक विद्यार्थ्यांनी दिली आहे. आदिवासी आश्रमशाळांमध्ये मागील दोन वर्षात सहाशेहून अधिक विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला आहे. त्यास सर्वस्वी आदिवासी विकास मंत्रालय जबाबदार असून, गडचिरोली येथे सर्पदंशाने मृत्युमुखी पडलेल्या विद्यार्थिनीं च्या पालकांना एक कोटी रुपयांची नुकसान भरपाई द्यावी, तसेच आश्रम शाळांमध्ये जेवण बनवण्याची परवानगी देऊन सेंट्रल किचन बंद करावे, आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांचा तात्काळ राजीनामा घ्यावा आदिवासी विकास मंत्रालयाचे सचिव इतर प्रशासनातील अधिकारी यांच्या तात्काळ बदल्या कराव्यात अशी मागणी या आंदोलनाद्वारे करण्यात आली होती. आंदोलक विद्यार्थ्यांनी नाशिक येथील आदिवासी विकास महामंडळाच्या कार्यालयासमोर ४८ दिवसांपासून आंदोलन करणाऱ्या सकल आदिवासी विद्यार्थी संघटनांच्या वतीने सुरू २८ सप्टेंबर पासून नाशिक ते राजभवन मुंबई येथे पर्यंत सुरू केलेला उलगुलान पायी मोर्चा रविवारी रात्री भिवंडीत दाखल झाला होता. भिवंडी बायपास येथे असलेल्या साई बाबा मंदिराच्या प्रांगणात रात्री आंदोलक विद्यार्थी विश्रांतीसाठी थांबले होते.येथे रात्री एक वाजता काही पोलिसांनी तुम्ही मुंबईला जाऊ शकता असे सांगितल्यानंतर विद्यार्थी खासगी वाहनाने मुंबईच्या दिशेने गेले. मात्र या विद्यार्थ्यांबाबत पोलीस यंत्रणेला समजताच ठाणे खरेगाव टोल नाक्यावर विद्यार्थ्यांची गाडी पोलिसांकडून अडवण्यात आली.



# सभापतीपदी कु. गौरी चंदन मुन्हे तर उपसभापतीपदी दिलीप डुबे बिनविरोध

राजगुरूनगर : (स. गांवकरी)

खेड पंचायत समितीच्या सभापतीपदी उद्धव ठाकरे शिवसेनेच्या कु.गौरी चंदन मुन्हे तर उपसभापतीपदी दिलीप डुबे याची बिनविरोध निवड झाली. सभापती विद्या मोहिते, उपसभापती मंगेश सावंत यांनी त्यांच्या पदाचा नुकताच राजीनामा दिला होता. आज सोमवारी (दि.५) निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी अनिल दौंडे यांच्या अधिपत्याखाली सभापती उपसभापती पदाची खेड पंचायत समितीच्या राजा शिवछत्रपती सभागृहात निवडणूक झाली. सभापतीपदासाठी उबाठा शिवसेनेच्या गौरी मु-हे यांनी उमेदवारी अर्ज भरला त्यांना सुचक ज्ञानेश्वर ढेरंगे, तर त्यांच्या प्रतिस्पर्धी राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या श्रद्धा मांडेकर यांनी उमेदवारी अर्ज भरला. त्यांना अश्विनी तरस सुचक होत्या. उपसभापतीपदासाठी उबाठा चे दिलीप डुबे यांनी अर्ज दाखल केला त्यांना मंगेश सावंत सुचक होते तर राष्ट्रवादी कॉंग्रेस कडून दिनेश हांडे यांनी अर्ज दाखल केला त्यांना निखिल थोरवे सूचक होते. सभापतीपदासाठी श्रद्धा मांडेकर तर उपसभापती पदासाठी दिनेश हांडे यांनी माघार घेतल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी अनिल दौंडे यांनी कु. गौरी मुन्हे यांची सभापतीपदी तर उपसभापतीपदी दिलीप डुबे याची बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर केले.यावेळी पंचायत समितीचे सर्व सदस्य उपस्थित होते. निवडीनंतर नवनिर्वाचित सभापती उपसभापती यांचा आमदार बाबाजी काळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी जिल्हा परिषद गटनेते ॲड विजय शिंदे, गणेश अरगडे, सदस्य दीप्ती भोगाडे, तनुजा घनवट, विनया मुंगसे, शिवसेनेच्या जिल्हा संघटक विजया शिंदे, जिल्हा प्रमुख रामदास धनवटे, उपजिल्हाप्रमुख शिवाजी वर्पे, तालुका प्रमुख किरण गवारे बाजार समितीचे सभापती अशोक राक्षे, माजी उपसभापती क्रांती सोमवंशी, संचालक सयाजी मोहिते, सोमनाथ मुंगसे यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.

# सचिन कल्याणशेट्टी बिनविरोध होण्याच्या मार्गावर?

अक्कलकोट : (स. गांवकरी)

सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीची तयारी सुरू असतानाच अक्कलकोट तालुक्यातील राजकीय समीकरणे बदलताना दिसत आहेत. संचालकपदासाठी इच्छुकांची संख्या असली, तरी उमेदवारीच्या पात्रतेसमोर थकीत कर्जवसुलीचा मोठा प्रश्न उभा राहिल्याने आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या विरोधात पर्याय उभा करण्याचे आव्हान वाढले आहे. अक्कलकोट तालुक्यातील ८९ विविध कार्यकारी सेवा सोसायट्यांपैकी फक्त आठ सोसायट्यांची कर्जवसुली शंभर टक्के झाली आहे. उर्वरित ८१ सोसायट्यांमध्ये थकबाकी असल्याने या संस्थांशी संबंधित इच्छुकांच्या उमेदवारीवर पात्रतेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्यामुळे निवडणुकीच्या मैदानात उतरण्यापूर्वीच अनेक इच्छुकांना नियमांच्या कसोटीला सामोरे जावे लागणार आहे.



सध्याच्या आकडेवारीनुसार अक्कलकोटमध्ये सोसायटी मतदारसंघाचे ८९, पणन संस्थांचे ४७ आणि इतर एक असे १३७ पात्र मतदार आहेत. त्यामुळे उपलब्ध पात्र संस्थांवरच पुढील निवडणूक गणित मोठ्या प्रमाणात अवलंबून राहणार आहे. अक्कलकोटमधील ३२ सोसायट्यांच्या ठरावांवर हरकती दाखल करण्यात आल्या आहेत. या हरकतींवर ५ ऑक्टोबरपासून पुण्यातील सहकार विभागाच्या कार्यालयात सुनावणी सुरू झाली आहे.

या निर्णयामुळे कोणत्या संस्था निवडणुकीच्या प्रक्रियेत कायम राहतात आणि कोणत्या बाद होतात, हे स्पष्ट होणार आहे. त्यामुळे या सुनावणीचा निकाल अक्कलकोटमधील DCC निवडणुकीच्या राजकीय समीकरणासाठी महत्त्वाचा ठरणार आहे. अक्कलकोटच्या सहकार क्षेत्रात दिवंगत सिद्रामप्पा पाटील यांचा दीर्घकाळ प्रभाव होता. मात्र, मागील काही वर्षांत आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी सहकार क्षेत्रातील हालचालींकडे अधिक लक्ष दिल्याचे दिसून येत आहे. DCC निवडणुकीच्या निमित्ताने या क्षेत्रातील राजकीय समीकरणे नव्याने जुळवली जात आहेत. विशेष म्हणजे विरोधी गटातील अनेक संस्थांच्या कर्जवसुलीची स्थिती आणि त्यांच्यावरील हरकती यामुळे उमेदवारीचा मार्गच अडचणीचा ठरण्याची शक्यता आहे. त्यामुळे कल्याणशेट्टी यांच्याविरोधात उमेदवार उभा राहणार की निवडणूक बिनविरोध करण्यासाठी प्रयत्न होणार, याकडे आता अक्कलकोटच्या सहकार क्षेत्राचे लक्ष लागले आहे. आता ३२ ठरावांवरील सुनावणीचा निकाल आणि अंतिम मतदार यादी स्पष्ट झाल्यानंतरच अक्कलकोटमध्ये DCC निवडणुकीचे खरे चित्र समोर येणार आहे.

# थोडक्यात पण महत्वाचे



## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भगिनी वासंतिबेन मोदी डांगच्या दौऱ्यावर

■ धार्मिक, ऐतिहासिक आणि निसर्गरम्य स्थळांना भेट देत वसंतिबेन मोदी यांनी अनुभवला अविस्मरणीय प्रवास

डांग (स. गांवकरी) : दक्षिण गुजरातमधील नैसर्गिक सौंदर्य, समृद्ध सांस्कृतिक वारसा आणि आध्यात्मिक परंपरेसाठी प्रसिद्ध असलेल्या डांग जिल्ह्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भगिनी वसंतिबेन मोदी यांनी त्यांचे पती हसमुखभाई मोदी तसेच मित्रपरिवारासह विशेष भेट दिली. डांगच्या निसर्गरम्य वातावरणाचा, धार्मिक स्थळांचा आणि स्थानिक संस्कृतीचा जवळून अनुभव घेण्याच्या उद्देशाने झालेल्या या प्रवासादरम्यान त्यांनी जिल्ह्यातील विविध धार्मिक, ऐतिहासिक आणि प्रेक्षणीय स्थळांना भेटी दिल्या. या अविस्मरणीय दौऱ्यात वासंतिबेन मोदी, हसमुखभाई मोदी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी रामायण काळाशी संबंधित पवित्र शबरीधाम, पंपा सरोवर आणि अंजनी कुंड येथे भेट देऊन दर्शन घेतले. तसेच ऐतिहासिक महत्त्व असलेल्या पांडव गुंफेलाही भेट देत डांगच्या प्राचीन वारशाची माहिती घेतली. यानंतर बिलमाल (तुळसीगड) येथील प्राचीन अर्धनारीश्वर महादेव मंदिरात त्यांनी पूजा-अर्चना करून भगवान महादेवाचे दर्शन घेतले आणि आध्यात्मिक समाधानाचा अनुभव घेतला.धार्मिक प्रवास पुढे नेत त्यांनी सुबीर येथे पूज्य असीमानंद स्वामीजींचे दर्शन घेऊन आशीर्वाद प्राप्त केले. त्यानंतर वासुर्णा येथील 'तेजस्विनी संस्कृती धाम' येथे ब्रह्मवादिनी पूज्य हेतल दीदी यांच्या सान्निध्यात 'शिवाश्रय तेजस्विनी कन्या छात्रालय'मधील मुलींसोबत सायंकाळच्या आरतीमध्ये सहभागी होत महाप्रसादाचा लाभ घेतला. या छात्रालयातील सुमारे ५० मुलींमध्ये शिक्षणासोबत स्वच्छता, संस्कार, संस्कृती आणि सहानुभूतीचे गुण रुजविले जात असल्याचे पाहून वसंतिबेन मोदी तसेच संपूर्ण मोदी परिवाराने आनंद व्यक्त केला.डांगच्या पवित्र भूमीवरील धार्मिक स्थळे, ऐतिहासिक वारसा, निसर्गसौंदर्य आणि संस्कृतीचा अनुभव घेत वसंतिबेन मोदी यांनी या प्रवासाच्या सुखद आठवणी सोबत घेऊन डांग दौऱ्याची सांगता केली.

## राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त ८ ऑक्टोबरला व्याख्यान

■ ज्येष्ठ संघ प्रचारक प्रा. रविंद्र भुसारी यांचे व्याख्यान; खा. नागेश पाटील आष्टीकर, डॉ. अजित गोपछडे यांची प्रमुख उपस्थिती

किनवट (स. गांवकरी) : राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त 'संघ शक्ती कलौ युगे' या संकल्पनेवर आधारित विशेष कार्यक्रमाचे आयोजन दुर्गा फाऊंडेशन, किनवटच्या वतीने करण्यात आले आहे. हा कार्यक्रम ८ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी किनवट शहरात कलावती गार्डन येथे आयोजित करण्यात आला असून, या कार्यक्रमात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ संघ प्रचारक तथा भारतीय जनता पक्षाचे माजी प्रदेश संघटनमंत्री प्रा. रविंद्रजी भुसारी यांचे विशेष व्याख्यान होणार आहे. कार्यक्रमास हिंगोली लोकसभा मतदारसंघाचे खासदार नागेश पाटील आष्टीकर तसेच नांदेड येथील राज्यसभा खासदार डॉ. अजित गोपछडे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षाच्या पार्श्वभूमीवर संघाचे कार्य, राष्ट्रनिर्माणातील योगदान, सामाजिक समरसता आणि संघटित समाजशक्ती याबाबत प्रा. भुसारी मार्गदर्शन करणार आहेत. किनवट शहर व परिसरातील नागरिकांसाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहून व्याख्यानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन दुर्गा फाऊंडेशनचे अध्यक्ष अक्षय भोयर व उपाध्यक्ष दुर्गा भोयर यांनी केले आहे.

## रामतीर्थ प्राथमिक आरोग्य केंद्रात परिचर वगळता कर्मचारी गैरहजर!

■ मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांच्या अचानक पाहणीत प्रकार उघड; रजेचे अर्जही नाहीत

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक महेश पाटील यांनी २ ऑक्टोबर रोजी बिलोली तालुक्यातील रामतीर्थ प्राथमिक आरोग्य केंद्राला अचानक भेट दिली. यावेळी परिचर वगळता इतर कर्मचारी केंद्रात उपस्थित नसल्याचे निदर्शनास आले. उपस्थिती मस्टर तपासला असता काही कर्मचाऱ्यांनी स्वाक्षऱ्या केलेल्या असतानाही ते प्रत्यक्षात केंद्रात उपस्थित नसल्याचे आढळले. तर काही कर्मचाऱ्यांनी मस्टरवर स्वाक्षरी केलेली नव्हती. दोन्ही बाबतीत अनुपस्थितीबाबत रजेचे अर्ज उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले. दरम्यान पाहणीची माहिती मिळाल्यानंतर वैद्यकीय अधिकारी डॉ. विवेक बोरसे काही वेळाने केंद्रात उपस्थित झाले. या प्रकाराची मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांनी गंभीर दखल घेतली असून, कर्तव्यावर गैरहजर आढळलेल्या कर्मचाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या पाहणीदरम्यान अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी परीक्षित यादव उपस्थित होते.

## १३० महिलांना पशुपालन व चारा व्यवस्थापनाचे प्रशिक्षण

नांदेड जिल्हा (स. गांवकरी) : पशुसंवर्धन विभाग, पंचायत समिती किनवट यांच्या वतीने प्रगती महिला बचत गट, किनवट येथील महिलांसाठी ५ व ६ ऑक्टोबर २०२६ रोजी दोन दिवसीय पशुपालन व चारा व्यवस्थापन प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. या प्रशिक्षणास बचत गटातील तब्बल १३० महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. प्रशिक्षणादरम्यान महिलांना शेळीपालनाचे शास्त्रीय व्यवस्थापन, पशुधनाचे आरोग्य, निकृष्ट चारा सकस करण्याच्या विविध पद्धती तसेच दुष्काळी परिस्थितीत चारा व पाण्याचे योग्य नियोजन याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. निकृष्ट चारा सकस करण्याच्या पद्धतींची प्रत्यक्ष प्रात्यक्षिकेही घेण्यात आली. यावेळी डॉ. संजीव पाटील सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, किनवट तसेच डॉ. योगेश पाटील, डॉ. उमेश सोनटक्के, डॉ. निरंजन बागल, डॉ. सुनील जाधव, डॉ. राहुल जोंधळे, डॉ. शितल वानखेडे, डॉ. लक्ष्मीकांत ढगारे यांच्यासह पशुसंवर्धन विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी महिलांना पशुपालनाच्या विविध बाबींवर मार्गदर्शन केले. शेळीपालनाच्या माध्यमातून महिलांना अतिरिक्त उत्पन्नाचे साधन उपलब्ध करून देणे, पशुधनाची उत्पादकता वाढविणे आणि उपलब्ध संसाधनांचा प्रभावी वापर करणे यासाठी शास्त्रीय पशुपालन पद्धतींचा अवलंब करण्याचे आवाहन करण्यात आले. दुष्काळी परिस्थितीत पशुधनाचे आरोग्य व उत्पादन टिकवून ठेवण्यासाठी चाऱ्याची उपलब्धता, योग्य साठवणूक, निकृष्ट चाऱ्याचे सकसीकरण आणि पाण्याचा काटकसरीने वापर यांचे महत्त्व प्रशिक्षणातून स्पष्ट करण्यात आले.

# निर्भया पथकाची जनजागृती

### विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेसाठी पोलीस विभागाकडून मार्गदर्शन; महिला सुरक्षेबाबत महत्त्वाच्या सूचना

अक्कलकोट : (स. गांवकरी)



श्री सिद्धेश्वर हायस्कूल, सलगर येथे अक्कलकोट विभागाच्या निर्भया पथकाच्या वतीने विद्यार्थिनींसाठी विशेष जनजागृती व मार्गदर्शन कार्यक्रम घेण्यात आला. विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेसह महिला अत्याचार, छेडछाड, सायबर गुन्हे, अनोळखी व्यक्तींपासून सावधगिरी तसेच अडचणीच्या प्रसंगी पोलिसांशी संपर्क साधण्याबाबत यावेळी मार्गदर्शन करण्यात आले. यांच्या अध्यक्षतेखाली DySP राजेंद्र टाकणे, PSI अजय सुतार यांच्यासह या कार्यक्रमास पोलीस हेडकॉन्स्टेबल आसिफ मोमीन तसेच महिला पोलीस अंमलदार नीता बिराजदार, रेणुका कोळी आणि मनीषा चिंचोळीकर उपस्थित होते. यावेळी पोलीस अधिकाऱ्यांनी विद्यार्थिनींशी संवाद साधत स्वसंरक्षण, महिला सुरक्षा, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर आणि सायबर फसवणुकीपासून बचाव याबाबत महत्त्वपूर्ण सूचना दिल्या. कोणत्याही प्रकारचा त्रास, धमकी किंवा गैरप्रकार घडल्यास घाबरून न जाता तातडीने पालक, शिक्षक किंवा पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले.

निर्भया पथकाच्या माध्यमातून महिला व मुलींच्या सुरक्षिततेसाठी पोलीस विभाग सातत्याने जनजागृती करीत असून, "महिलांची सुरक्षा ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे" असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. शाळेत घेण्यात आलेल्या या मार्गदर्शनामुळे विद्यार्थिनींमध्ये सुरक्षिततेबाबत जागरूकता निर्माण होऊन, कोणत्याही अडचणीच्या प्रसंगी परिस्थितीला धैर्याने सामोरे जाण्याचा आत्मविश्वास वाढण्यास मदत झाली.

# इंडियन स्कूल ऑफ बिझनेसची २५ वर्षे पूर्ण

हैदराबाद/मोहाली : (स. गांवकरी)

ISB 25

फायनान्शियल टाइम्स ग्लोबल एमबीए रँकिंग्स 2026 मध्ये भारतात प्रथम आणि जगात 12व्या क्रमांकावर असलेल्या इंडियन स्कूल ऑफ बिझनेस (ISB)ने आपला 25 वा वर्धापनदिन साजरा केला. यानिमित्त ISB@25 या दीर्घकालीन उपक्रमांची घोषणा करण्यात आली. या उपक्रमाचा उद्देश मॅनेजमेंट शिक्षण अधिक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणे तसेच भारतातील संशोधन आणि शिक्षणाची क्षमता मजबूत करणे हा आहे. ISB25 स्कॉलर्स प्रोग्राम अंतर्गत ISB दरवर्षी 250 शिष्यवृत्ती देणार आहे. या शिष्यवृत्ती ISBच्या प्रमुख पोस्ट ग्रॅज्युएट प्रोग्राम इन मॅनेजमेंट (पीजीपी) आणि पीजीपी इन मॅनेजमेंट फॉर यंग लीडर्स (पीजीपी YL) या अभ्यासक्रमांसाठी दिल्या जातील. ही शिष्यवृत्ती गुणवत्ता आणि आर्थिक गरज यांच्या आधारावर दिली जाईल. यामध्ये विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्कात 100%, 50%, 30% आणि 25% पर्यंत सवलत मिळणार आहे. देशातील विविध क्षेत्रांतील हुशार विद्यार्थ्यांना ISBमध्ये शिक्षणाची संधी मिळावी, हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. वेगवेगळ्या आर्थिक, भौगोलिक आणि व्यावसायिक पार्श्वभूमीतील हुशार विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे मॅनेजमेंट शिक्षण मिळावे, यासाठी हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. यासोबतच ISB इंडिया रिसर्च कॉमन्स हे राष्ट्रीय स्तरावरील संशोधन व्यासपीठ सुरू करणार आहे. यामधून देशभरातील संशोधकांना निवडक डेटासेट, संशोधन साधने, संशोधन पद्धतीशी संबंधित संसाधने आणि एआय आधारित संशोधन सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

# SIR विरोधावरून रविंद्र चव्हाण आक्रमक; ठाकरे बंधूंच्या 'गर्जना

मुंबई : (स. गांवकरी)



मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरावलोकनाच्या प्रक्रियेवरून अर्थात SIR महाराष्ट्रातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. SIR प्रक्रियेला विरोध करणाऱ्या ठाकरे बंधूंसह विरोधकांच्या भूमिकेवर भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी जोरदार पलटवार केला आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी संसदेत SIR संदर्भात मांडलेल्या भूमिकेचा व्हिडिओ समाजमाध्यमावर प्रसारित करत चव्हाण यांनी विरोधकांसमोर काही थेट सवाल उपस्थित केले आहेत. ठाकरे बंधूंच्या नेतृत्वाखाली SIR विरोधात आयोजित करण्यात आलेल्या 'गर्जना मोर्चा'च्या पार्श्वभूमीवर चव्हाण यांच्या भूमिकेमुळे या मुद्द्यावर सत्ताधारी आणि विरोधकांमधील संघर्ष आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे. रविंद्र चव्हाण यांनी केंद्रीय गृहमंत्र्यांच्या संसदेतील भूमिकेचा संदर्भ देत विरोधकांना सवाल केला आहे की, देशाचे पंतप्रधान आणि राज्याचे मुख्यमंत्री कोण असावेत, हे घुसखोरांनी ठरवायचे का? मतदार यादीत बेकायदेशीररीत्या वास्तव्यास असलेल्या व्यक्तींचा समावेश झाल्यास आणि त्यांना मतदानाचा अधिकार मिळाल्यास लोकशाही व्यवस्थेच्या निष्पक्षतेवर परिणाम होणार नाही का, असा मुद्दाही त्यांनी उपस्थित केला. मतदार याद्यांमधील दुबार नोंदींच्या मुद्द्यावरही चव्हाण यांनी विरोधकांना लक्ष्य केले. एका मतदाराला एकापेक्षा अधिक ठिकाणी मतदान करण्याची मुभा असावी का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

# भाजपकडूनच १४ सोसायट्यांच्या ठरावांवर घेतला आक्षेप

### सुभाष देशमुख विजय देशमुख यांनी केल्या सहाय्यक निबंधका कडे लेखी तक्रारी

सोलापूर : (स. गांवकरी)



सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या (डीसीसी) निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दक्षिण सोलापूर तालुक्यातील १४ विकास सोसायट्यांच्या प्रतिनिधींच्या ठरावांवर भाजपकडूनच आक्षेप घेण्यात आल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. संबंधित ठरावांवर पुणे विभागीय सहनिबंधक दिग्विजय आहेर यांच्याकडे हरकती दाखल करण्यात आल्या आहेत.

या ठरावांमध्ये निवड झालेल्या प्रतिनिधींचा संबंधित सोसायटीच्या कार्यक्षेत्राशी संबंध नसल्याचा, तसेच ते संस्थेचे सभासद, खातेदार किंवा कर्जदार नसल्याचा दावा हरकतींमध्ये करण्यात आला आहे.

सोलापूर दक्षिणचे आमदार सुभाष देशमुख यांच्या समर्थकांकडून या हरकती दाखल करण्यात आल्या आहेत, दरम्यान, आमदार सुभाष देशमुख यांनीही काही सोसायट्यांचे ठराव चुकीच्या पद्धतीने झाल्याचा आक्षेप घेत सहाय्यक निबंधकांकडे लेखी तक्रार केली आहे. त्यामुळे डीसीसी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपमधील अंतर्गत राजकीय समीकरणे चर्चेत आली आहेत.

आता पुणे विभागीय सहनिबंधक दिग्विजय आहेर या १४ सोसायट्यांच्या ठरावांवरील हरकतींवर काय निर्णय घेतात, याकडे सहकार क्षेत्राचे लक्ष लागले आहे. बँकेच्या निवडणुकीसाठी प्रबळ दावेदार मानले जाणारे श्रीदीप सुरेश हसापुरे यांचा बोळकवठे सोसायटीतून ठराव करण्यात आला आहे. मात्र, ते स्थानिक रहिवासी, खातेदार वा कर्जदार नसल्याचा दावा करत राम गायकवाड यांनी त्यांच्या नावावर हरकत घेतली आहे.

भंडारकवठे येथील रमेश गोविंद पाटील यांचा खानापूर सोसायटीतून झालेला ठराव.

विंचूरचे रेवणसिद्ध हिंगमिरे यांचा अंत्रोळी सोसायटीतून झालेला ठराव आहे. ते तेथील रहिवासी अथवा खातेदार नसल्याचा आक्षेप.

कुंभारीच्या उज्वला लिंगराज रामपूरे यांचा बोरूळ सोसायटीतून झालेला ठराव.

सचिव प्रदीप श्रीमंत खूने यांच्या पत्नी सुनीता खूने यांचा चिंचपूर सोसायटीतून झालेला ठराव.

विंचूरचे आमसिध बिराजदार यांचा शंकरनगर सोसायटीतून झालेला ठराव.

कंदलगावचे महेश विभूते यांचा हिपळे सोसायटीतून, द्राक्षायणी बिराजदार यांचा बसवनगर सोसायटीतून, कस्तुराबाई जोकारे यांचा सादेपूर सोसायटीतून, तर बंकलगी येथील सचिव नागनाथ चडचणे यांचा सिंदखेड सोसायटीतून करण्यात आलेला ठराव.

# भटक्या कुत्र्यांची मोठी दहशत; जीवनमान धोक्यात

सोलापूर : (स. गांवकरी)



सोलापूर शहरात जवळपास 80 हजार भटके कुत्रे असून रोज 10 ते 15 लोकांना हे भटके कुत्रे चावत आहेत त्या मुळे नागरिकांचे जीवन धोक्यात आले असून सोलापूर महानगरपालिकेने या कुत्र्यांचा बंदोबस्त करावा अशी मागणी सोलापूर शहर उत्तर चे आमदार आणि माजी मंत्री विजयकुमार देशमुख मालक यांनी पावसाळी अधिवेशनात केली होती तरीही सोलापूर महानगरपालिकेने या कडे काना डोळा करून दुर्लक्ष केले आहे यामुळे नागरिकात तीव्र संताप पसरला आहे

घोंगडे वस्ती येथील लहानg मुलास भटका कुत्रा चावल्याने त्याला रेबीज ची लागण होऊन त्याचा मृत्यू झाल्याचे घटना ताजी असतानाच आज साखर पेठ येथे भटक्या कुत्र्याने लहान मुलास चावा घेऊन त्याला गंभीर जखमी केल्याची घटना घडली आहे व. तर गेल्या आठवड्यात न्यू बुधवार पेठ येथे महात्मा फुले चौका मध्ये भटक्या कुत्र्याने 5वर्षाच्या लहान बाळा ला तोंडाला चावा घेऊन गंभीर जखमी केले आहे.

साखर पेठेत भटक्या कुत्र्याची मोठी दहशत पसरली आहे. सोलापुरातील साखर पेठ परिसरात आज सकाळी एका ८ वर्षांच्या चिमुरड्यावर भटक्या कुत्र्याने हल्ला करून त्याला गंभीर जखमी केल्याची घटना घडली आहे . लक्ष्मी बँकेजवळ मुलगा घराबाहेर असताना अचानक कुत्र्याने त्याच्यावर झडप घातली आणि त्याला चावा घेतला. घटनेनंतर परिसरातील नागरिकांनी तात्काळ धाव घेत मुलाची सुटका केली.

जखमी मुलाला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. भटक्या कुत्र्यांच्या वाढत्या समस्येवर प्रशासनाने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

सोलापूर शहरात सर्वत्र मोठ्या प्रमाणात भटके कुत्रे वाढले असून चौका चौकात त्यांची दहशत निर्माण झाली आहे रस्त्यावर येणाऱ्या जाणाऱ्या लोकांना लहान मुले महिला यांना चावा घेण्याचे

किंवा मोटार सायक स्वाराचा पाठलाग करण्याचे प्रयत्न करत असल्यामुळे नागरिक गाड्या घेऊन पडत असून जखमी होत आहेत त्यामुळे सोलापूर महानगरपालिकेने तत्काळ भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करावा अन्यथा महापौर आणि पालिका आयुक्त यांना जबाबदार धरून नुकसान भरपाईची कारवाई कोर्टा मार्फत करण्यात येईल असा इशारा नागरिक संरक्षण हक्क समितीचे अध्यक्ष आणि वरिष्ठ पत्रकार महेश गायकवाड यांनी दिला आहे.

नागरिकांच्या जीवितास काही झाले तर महापौर आणि सोलापूर महापालिका आयुक्त जबाबदार असणार भटके कुत्रे चावून नागरिकांचे जीव जात आहेत. या भटक्या कुत्र्यांमुळे नागरिकांच्या जीवांचे बरे वाईट होण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहेत त्यामुळे सोलापूर महानगरपालिकेने तत्काळ भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करावे आणि नागरिकांच्या जीवाचे रक्षण करावे

**विजयकुमार देशमुख**
**आमदार उत्तर**
**सोलापूर विधानसभा**

# दुष्काळग्रस्त तालुक्यातील विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्कातून सवलत

नांदेड जिल्हा (स. गांवकरी)

■ स्वारातीम विद्यापीठाचा हिवाळी-२०२६ परीक्षेसाठी महत्त्वपूर्ण निर्णय

राज्यातील दुष्काळसदृश परिस्थिती लक्षात घेऊन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने दुष्काळग्रस्त तालुक्यांतील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना हिवाळी-२०२६ परीक्षेच्या परीक्षा शुल्कातून सवलत देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. यामुळे आर्थिक अडचणीत असलेल्या विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली १ ऑक्टोबर, २०२६ रोजी झालेल्या ऑनलाइन बैठकीत राज्यातील दुष्काळसदृश परिस्थितीचा आढावा घेण्यात आला. या बैठकीत स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये, विद्यापीठाची संकुले व उपपरिसरे तसेच इतर संबंधित संस्थांमध्ये पदवी, पदविका, पदव्युत्तर आणि व्यावसायिक अभ्यासक्रमांचे शिक्षण घेणाऱ्या पात्र नियमित विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क आकारू नये, अशा सूचना देण्यात आल्या. त्यानुसार हिवाळी-२०२६ अर्थात नोव्हेंबर-डिसेंबर २०२६ मध्ये होणाऱ्या पदवी, पदविका तसेच पदव्युत्तर, व्यावसायिक व अव्यावसायिक नियमित अभ्यासक्रमांच्या परीक्षांसाठी दुष्काळग्रस्त तालुक्यातील पात्र विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क आकारले जाणार नाही. यासाठी संबंधित विद्यार्थ्यांची माहिती विद्यापीठाने निर्धारित केलेल्या नमुन्यात महाविद्यालयांनी सादर करणे आवश्यक आहे. या सवलतीसाठी विद्यार्थ्यांनी दुष्काळग्रस्त तालुक्यातील रहिवासी असल्याचा पुरावा तसेच कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न आठ लाख रुपयांपर्यंत असल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

# धुळे जिल्ह्याच्या ऊर्जा क्षेत्रातील प्रगतीचा नवा अध्याय

धुळे : (स. गांवकरी)

■ बलसाणे पॉवरट्रान्समिशन प्रकल्पउत्तर महाराष्ट्राचा ऊर्जा पायाभूत आराखडा बळकट करणार

भारत जेव्हा स्वच्छ ऊर्जेच्या भविष्याकडे वाटचाल करत आहे, तेव्हा या परिवर्तनाला आधार देणाऱ्या पारेषण पायाभूत सुविधा बळकट करण्यात धुळे महत्त्वाची भूमिका बजावणार आहे. 'रेसोनिया' (Resonia) द्वारे संपादित करण्यात आलेला नवीन 'बलसाणे पॉवर ट्रान्समिशन लिमिटेड' प्रकल्प, धुळे आणि उत्तर महाराष्ट्रासाठी अधिक मजबूत आणि भविष्यासाठी सज्ज असे ऊर्जा जाळे उभारण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. धुळे आणि नाशिक जिल्ह्यांमध्ये सुमारे २१० किमी अंतरावर पसरलेला हा प्रकल्प राज्यातील वीज वहन क्षमता बळकट करेल आणि महाराष्ट्राच्या पारेषण जाळ्यात अतिरिक्त वीज निर्मिती क्षमतेचा समावेश करण्यास मदत करेल. या जाळ्यामध्ये ७६५ केव्ही (kV), ४०० केव्ही आणि २२० केव्ही क्षमतेच्या पारेषण वाहिन्यांचा समावेश असेल, ज्यामुळे प्रमुख ऊर्जा स्रोत आणि विजेची मागणी असलेली केंद्रे यांच्यात मजबूत संपर्क निर्माण होईल. या प्रकल्पाच्या आराखड्यात भविष्यातील विस्ताराची तरतूदही करण्यात आली आहे, ज्यामुळे विजेची मागणी वाढल्यास सबस्टेशनमध्ये अतिरिक्त पारेषण क्षमता सामावून घेणे शक्य होईल.

# महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्यावतीने आंदोलन

नांदेड : (स. गांवकरी)

महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्या सोलापूर येथील बैठकीत ठरल्याप्रमाणे वृत्तपत्र विक्रेत्यांच्यासाठी मंत्रिमंडळाने निर्णय घेतलेल्या स्वतंत्र वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी महामंडळाची अंमलबजावणी करावी या मागणीसाठी 9 ऑक्टोबर रोजी राज्यभर जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चे काढण्याचा निर्णय झाला आहे. त्याच धर्तीवर काल नांदेड येथे विसावा उद्यान मधील वृत्तपत्र वितरण सेंटरवर राज्याचे कार्याध्यक्ष बालाजी पवार यांच्या अध्यक्षतेखाली व चंद्रकांत घाटोळ यांच्या उपस्थितीत गेटमिटींग घेण्यात आली. नांदेड येथे 9 ऑक्टोबर रोजी सकाळी 11.30 वाजता भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथून लेकरा बाळा सह लोकशाही व शांततेच्या मार्गाने मोर्चा निघून जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकणार आहे. यासाठी सर्व तयारी झाली आहे. पोलिस अधीक्षक, पोलीस निरीक्षक वजीराबाद व वाहतूक निरीक्षक यांना पत्र देण्यात आले आहे. अशी माहिती यावेळी बोलतांना बालाजी पवार यांनी दिली. या स्वतंत्र वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी महामंडळाच्या माध्यमातून वृत्तपत्र विक्रेत्यांच्यासह वृत्तपत्र व्यवसायात कार्यरत असणाऱ्या सर्वच कर्मचाऱ्यांच्या साठी कल्याणकारी योजना राबवण्यातची मागणी आहे. यासाठी छपाई माध्यमातील व वेगवेगळ्या मिडीयातील सर्वांनी मोर्चामध्ये सहकुटुंब उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयावर जन्मल्यानंतर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना जिल्हाधिकारी यांचे मार्फत निवेदन सादर केले जाणार आहे.महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आक्टोंबर 10 ऑक्टोबर 2024 मध्ये जाहीर केलेल्या स्वतंत्र विक्रेता कल्याणकारी मंडळाची तात्काळ अंमलबजावणी करावी, महामंडळाच्या योजना चालवण्यासाठी शासनाने अर्थसंकल्पात पुरेशी आर्थिक तरतूद करावी, विक्रेत्यांसाठी आरोग्य विमा, अपघात विमा आणि निवृत्ती वेतन योजना त्वरित सुरू कराव्यात, राज्यातील सर्व अधिकृत वृत्तपत्र विक्रेत्यांची नोंदणी प्रक्रिया तातडीने सुरू करण्यात यावी यासह महामंडळाच्या माध्यमातून वृध्द वृत्तपत्र विक्रेत्यांना निवृत्ती वेतन लागु करावे, शासकीय घरकुल योजनेत वृत्तपत्र विक्रेत्याकरीता राखीव कोटा ठेवावा, वृत्तपत्र विक्रेत्याला 75 टक्के किंवा अधिक कायमचे अपंगत्व आल्यास आर्थिक साहाय्य मिळावे, वृत्तपत्र विक्रेत्याचा मृत्यु झाल्यास त्याच्या विधवा पत्नीस अथवा स्त्री वृत्तपत्र विक्रेत्यास विधुर पतीस आर्थिक साहाय्य, वृत्तपत्र विक्रेत्याचा वृत्तपत्र वाटपाचे कामावर असतांना मृत्यु झाल्यास वारसास आर्थिक साहाय्य मिळावे, वृत्तपत्र विक्रेत्याच्या गंभीर आजाराच्या उपचारार्थ अर्थ साहाय्य मिळावे, मोक्याचे ठिकाणी पेपर स्टॉल करिता जागा आरक्षीत करुन द्यावी व अस्तित्वात असलेले स्टॉल अतिक्रमणात गृहीत धरु नये, रस्ते रुंदीकरण व विकासाचे योजनेअंतर्गत स्टॉल हलविण्यापुर्वी वृत्तपत्र विक्री व्यवसायाकरीता साईची पर्यायी जागा द्यावी.

नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 । पाने : ५ । वर्ष : ४ थे । अंक : २९२ । किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
# समर्थ गांवकरी
संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




बुधवार दि. ०७ ऑक्टोंबर २०२६
मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

# ‘सीएम सृष्टी’ योजना राबविण्यास मंजुरी

## संशोधनाला चालना; वडार समाजाच्या खनिज उत्खनन मर्यादेत वाढ




**मुंबई (समर्थ गांवकरी)**

राज्यातील सार्वजनिक विद्यापीठे, शासकीय महाविद्यालये आणि तंत्रनिकेतनांमध्ये संशोधन, नवोन्मेष आणि तंत्रज्ञान विकासाला चालना देण्यासाठी ‘सीएम सृष्टी’ योजना राबविण्यास मंत्रिमंडळाने मंगळवारी मंजुरी दिली. २०२६-२७ ते २०३०-३१ या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या या योजनेत डीप टेक आणि फ्रंटिअर टेक्नॉलॉजीसाठी उत्कृष्टता केंद्रे, संशोधन निधी, संशोधन पार्क तसेच उद्योग-शैक्षणिक भागीदारीला प्रोत्साहन दिले जाणार आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, इंडस्ट्री ५.०शी सुसंगत अभ्यासक्रम आणि आंतरराष्ट्रीय विद्यापीठांशी सहकार्यावरही भर राहणार आहे.

उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अखत्यारितील सार्वजनिक विद्यापीठे, शासकीय उच्च व तंत्रशिक्षण संस्था, तंत्रनिकेतने, रसायन तंत्रज्ञान संस्था, मुंबई, कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग, पुणे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे येथे ही योजना राबविण्यात येईल. योजनेच्या अंमलबजावणीसाठी उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या सचिवांच्या अध्यक्षतेखाली सुकाणू समिती स्थापन करण्यात येणार आहे.

पिढीजात दगडफोडी आणि गौण खनिज उत्खननाचा व्यवसाय करणाऱ्या वडार समाजाला दिलासा देत, स्वामित्वधनमुक्त उत्खननाची वार्षिक मर्यादा २०० वरून ५०० ब्रास करण्यास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. त्यासाठी महाराष्ट्र जमीन महसूल (गौण खनिजांचे उत्खनन व ती काढणे) नियम, १९६८ मध्ये सुधारणा करण्यात येणार आहे. वाढलेला उत्खनन, वाहतूक, मजुरी आणि इंधनाचा खर्च लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे.

स्वाधार योजनेचे अनुदान ८० हजारांपर्यंत

अनुसूचित जाती आणि नवबौद्ध प्रवर्गातील, शासकीय वसतिगृहासाठी पात्र असूनही प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांसाठीच्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेतील वार्षिक अनुदानात वाढ करण्यात आली आहे. मुंबई, पुणे, ठाणे, नवी मुंबई, पिंपरी-चिंचवड आणि नागपूर येथे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना आता ८० हजार रुपये, इतर विभागीय मुख्यालय व ‘क’ वर्ग महानगरपालिका क्षेत्रात ६८ हजार, इतर जिल्ह्यांच्या ठिकाणी ५७ हजार आणि तालुक्याच्या ठिकाणी ५० हजार रुपये वार्षिक अनुदान मिळेल. वैद्यकीय व अभियांत्रिकी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याकरिता आठ हजार, तर अन्य शाखांच्या विद्यार्थ्यांना चार हजार रुपये अतिरिक्त मिळतील.

‘स्वयंम’मधील आदिवासी विद्यार्थ्यांनाही वाढीव भत्ता

अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठीच्या पंडित दीनदयाल उपाध्याय ‘स्वयंम’ योजनेतील भत्त्यांमध्येही वाढ करण्यात आली. मुंबई, पुणे, ठाणे, नवी मुंबई आणि नागपूर येथे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना भोजन, निवास व निर्वाह भत्त्यासाठी एकूण ८० हजार रुपये मिळतील. इतर विभागीय मुख्यालय व ‘क’ वर्ग महानगरपालिका क्षेत्रासाठी ६८ हजार, इतर जिल्ह्यांसाठी ५७ हजार आणि अन्य ठिकाणांसाठी ५० हजार रुपये वार्षिक अनुदान राहील. वैद्यकीय व अभियांत्रिकी विद्यार्थ्यांना आठ हजार, तर अन्य शाखांच्या विद्यार्थ्यांना चार हजार रुपये शैक्षणिक साहित्याकरिता अतिरिक्त दिले जातील.

वसतिगृह कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ

अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांसाठी स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या २ हजार ३८८ अनुदानित वसतिगृहांतील अधीक्षक, स्वयंपाकी, मदतनीस आणि चौकीदारांच्या मानधनात वाढ करण्यासही मंजुरी देण्यात आली. महानगर क्षेत्र तसेच अ व ब वर्ग महानगरपालिका क्षेत्रातील वसतिगृहांत अधीक्षकांचे मानधन २० हजार, स्वयंपाकी १७ हजार, तर मदतनीस आणि चौकीदारांचे १५ हजार रुपये करण्यात येणार आहे. इतर क्षेत्रांत अनुक्रमे १५ हजार, १२ हजार आणि १० हजार रुपये मानधन राहील. मुलींच्या वसतिगृहांत महिला अधीक्षक आणि २४ तास पहारेकरी उपलब्ध असणे बंधनकारक करण्यात आले आहे.

# पावसाने पुन्हा वळण घेतलं!

## महाराष्ट्रातील ‘या’ भागांत जोरदार सरींची शक्यता

**मुंबई (समर्थ गांवकरी)**

राज्यातून मॉन्सूनने माघार घेतल्याची घोषणा भारतीय हवामान विभागाने केली असतानाच, महाराष्ट्रातील काही भागांत पुन्हा पावसाची शक्यता निर्माण झाली आहे. राज्यातील बहुतांश भागात सध्या पावसाने उघडीप दिली असली, तरी काही ठिकाणी ढगाळ वातावरण आणि पावसाच्या सरी पाहायला मिळण्याची शक्यता आहे. दुसरीकडे अनेक भागांत ऑक्टोबर हिटचा तडाखा जाणवत आहे.

हवामान विभागाने ६ ऑक्टोबर रोजी कोकण, पश्चिम महाराष्ट्रातील काही भाग आणि मराठवाड्यातील काही जिल्ह्यांत पावसाची शक्यता व्यक्त केली आहे.

रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यांत उष्ण व दमट वातावरण राहण्याची शक्यता असून, दुपारनंतर काही ठिकाणी हलक्या पावसाच्या सरी कोसळू शकतात. सिंधुदुर्गातही पावसाची शक्यता असून, यावेळी ताशी ३० ते ४० किलोमीटर वेगाने वारे वाहण्याचा अंदाज आहे.

दरम्यान, पालघर, ठाणे आणि मुंबईत हवामान प्रामुख्याने कोरडे राहण्याचा अंदाज आहे. या भागांत पावसाची शक्यता तुलनेने कमी आहे.

पश्चिम महाराष्ट्रात कोल्हापूर आणि सातारा जिल्ह्यांच्या घाटमाथ्यावर विजांच्या कडकडाटासह पाऊस होण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. या भागांसाठी यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

त्यामुळे एकीकडे राज्यात ऑक्टोबर हिटचा तडाखा जाणवत असताना दुसरीकडे काही भागांत पुन्हा पावसाच्या सरींची शक्यता निर्माण झाली आहे. नागरिकांनी स्थानिक हवामानाच्या अंदाजानुसार खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# अधिक्षकांनी केवळ नोकरी न समजता, आदिवासी विद्यार्थ्यांचे पालक म्हणून संगोपन करावे : डॉ अशोक उईके



**मुंबई (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्रातील शासकीय आदिवासी आश्रमशाळांमध्ये कार्यरत अधीक्षक व अधीक्षिका यांच्या विविध प्रलंबित सेवाविषयक व प्रशासकीय प्रश्नांबाबत शासकीय आदिवासी आश्रमशाळा अधीक्षक संघटना, महाराष्ट्र राज्यच्या प्रतिनिधी मंडळाने आज आदिवासी विकास मंत्री मा. ना. प्रा. डॉ. अशोकराव उइके यांची भेट घेऊन विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली. यावेळी अधीक्षक व अधीक्षिका संवर्गाच्या पदोन्नतीसह आश्रमशाळांमधील विद्यार्थी सुरक्षा, आवश्यक मनुष्यबळ, प्रशासकीय अधिकार, जुनी पेन्शन योजना, पायाभूत सुविधा, अधिक्षक अधीक्षिका यांचे कामाचे तास, सरसकट सर्व आश्रमशाळांवर सहायक अधिक्षक व सहायक अधीक्षिका आणि मध्यवर्ती स्वयंपाकगृह यांसारख्या महत्त्वाच्या विषयांकडे मंत्री महोदयांचे लक्ष वेधण्यात आले.

अधीक्षक व अधीक्षिका यांना दीर्घकाळ एकाच पदावर कार्यरत राहावे लागत असल्याने मर्यादित विभागीय परीक्षेद्वारे पदोन्नतीची संधी उपलब्ध करून देण्याची मागणी संघटनेने केली. यासाठी सेवा नियमांमध्ये आवश्यक सुधारणा करून सेवाज्येष्ठता, अनुभव, शैक्षणिक पात्रता आणि विभागीय परीक्षा घेवून पदोन्नतीची व्यवस्था करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. तसेच अधीक्षक व अधीक्षिका यांना त्यांच्या अनुभव व पात्रतेनुसार वरिष्ठ आदिवासी विकास निरीक्षक, संशोधन सहाय्यक, नियोजन अधिकारी, गृहपाल यांसह संबंधित पदांवर १०० टक्के पदोन्नतीचा मार्ग उपलब्ध करून द्यावा, तसेच दिनांक १२ जून २००७ च्या अधिसूचनेमुळे निर्माण झालेल्या पदोन्नतीच्या अडचणींचा पुनर्विचार करून पदोन्नतीचा अनुशेष दूर करावा, अशी मागणीही करण्यात आली.

आदिवासी विकास विभागाच्या मंत्रालयीन दिनांक ०७ जानेवारी २००४ रोजीच्या अधिसूचनेच्या अनुषंगाने अधीक्षक व अधीक्षिका यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्यात यावा, अशी मागणीही यावेळी करण्यात आली.

निवासी स्वरूपाच्या आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध असणे आवश्यक असल्याचे संघटनेने निदर्शनास आणून दिले. प्रत्येक आश्रमशाळेत तीन शिफ्टमध्ये तीन सुरक्षा रक्षक उपलब्ध करून देणे, वर्ग-४ कर्मचाऱ्यांची रिक्त पदे तातडीने भरणे, आवश्यक सफाई कर्मचारी उपलब्ध करून देणे तसेच विद्यार्थी संख्येची अट रद्द करून प्रत्येक शाळेत एक पुरुष सहाय्यक अधीक्षक व एक महिला सहाय्यक अधीक्षिका उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली.

# आरोग्य प्रशासनात ‘परफॉर्मन्स-बेस्ड पोस्टिंग’चा नवा अध्याय

## मागील तीन वर्षांच्या कामगिरीचे १०० गुणांत वस्तुनिष्ठ मुल्यमापन

**मुंबई (समर्थ गांवकरी)**

सार्वजनिक आरोग्य विभागाने जिल्हा शल्य चिकित्सक आणि जिल्हा आरोग्य अधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांच्या कामगिरीचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन करून महत्त्वाच्या व जिल्हास्तरीय पदांवर गुणवत्ताधारित पदस्थापना देण्याचे धोरण निश्चित केले आहे. अधिकाऱ्यांच्या मागील तीन वर्षांतील उपलब्ध व प्रमाणित कामगिरीचे १०० गुणांच्या निकषांवर मूल्यमापन केले जाणार असून,आरोग्य प्रशासनात ‘परफॉर्मन्स-बेस्ड पोस्टिंग’चा नवा अध्याय सुरू होणार आहे. यामुळे शासकीय आरोग्य सेवेची गुणवत्ता आणि प्रशासकीय गतिमानता वाढविण्याचा शासनाचा उद्देश आहे.

राज्यातील नागरिकांना दर्जेदार व गतिमान आरोग्य सेवा देणे, मातामृत्यू व बालमृत्यूचे प्रमाण कमी करणे आणि नीती आयोगाने निश्चित केलेले शाश्वत विकास ध्येय साध्य करण्यासाठी कामगिरीवर आधारित पारदर्शक पदस्थापना प्रणाली विकसित करण्यात आली आहे. यासंदर्भात शासनाने ६ ऑक्टोबर २०२६ रोजी शासन निर्णय जारी केला आहे.

ही कार्यपद्धती जिल्हा शल्य चिकित्सक, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक, वैद्यकीय अधीक्षक, जिल्हा आरोग्य अधिकारी, अतिरिक्त व सहायक जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी, जिल्हा क्षयरोग अधिकारी, वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांच्यासह शासन निर्णयात नमूद केलेल्या संबंधित पदांना लागू राहील. शासन आवश्यकतेनुसार अन्य तत्सम जिल्हास्तरीय प्रमुख आरोग्य पदांचाही या कार्यपद्धतीत समावेश करू शकेल.

मूल्यमापनामध्ये जनाभिमुखता व तक्रार निवारण, नेतृत्वगुण, आर्थिक व्यवस्थापन, आहार-पोषण, औषधे व स्वच्छता, मनुष्यबळ व्यवस्थापन, नैसर्गिक आपत्ती व साथरोगातील कार्य, राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत वैद्यकीय कामगिरी, शासकीय मोहिमांची अंमलबजावणी, डिजिटल सेवा, आयुष्मान भारत व महात्मा फुले जनआरोग्य योजनेची एकत्रित अंमलबजावणी तसेच जिल्हा आरोग्य सेवा बळकटीकरणाचे भविष्यातील नियोजन या ११ घटकांचा समावेश आहे.

विभाग मूल्यमापनासाठी आरोग्य व्यवस्थापन माहिती प्रणाली, अधिकृत पोर्टल, राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांचे अहवाल, राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानके, कायाकल्प व भारतीय सार्वजनिक आरोग्य मानकांचे अहवाल, आर्थिक व लेखापरीक्षण नोंदी, तपासणी अहवाल, औषधे व उपकरणांची उपलब्धता, मनुष्यबळ नोंदी, रुग्ण अभिप्राय आणि तक्रार निवारण नोंदींचा वापर करेल. प्रत्येक निर्देशांकासाठी अधिकृत व पडताळणीयोग्य पुरावा आवश्यक राहील आणि एकाच कामगिरीसाठी दुहेरी गुण दिले जाणार नाहीत.

एकूण गुणांनुसार ७१ ते १०० गुण मिळविणाऱ्या अधिकाऱ्यांना ‘अ-उत्कृष्ट’, ५० ते ७० गुण मिळविणाऱ्यांना ‘ब-अतिशय चांगली’, ३० ते ४९.९९ गुण मिळविणाऱ्यांना ‘क-समाधानकारक’ आणि ३० पेक्षा कमी गुण मिळविणाऱ्यांना ‘ड-सुधारणा आवश्यक’ अशी श्रेणी दिली जाईल. ‘अ’ श्रेणीतील अधिकाऱ्यांचा गुणवत्ताधारित पदस्थापनेसाठी प्राधान्याने, तर ‘ब’ श्रेणीतील अधिकाऱ्यांचा त्यानंतर विचार केला जाईल.

मूल्यमापन श्रेणी हा पदस्थापनेचा एकमेव निकष राहणार नाही. अंतिम पदस्थापना करताना पात्रता, सेवाज्येष्ठता, अनुभव, उपलब्ध पदे, आरक्षणाच्या तरतुदी, प्रशासकीय आवश्यकता, संवर्ग नियम, बदलीविषयक कायदे व नियम आणि अन्य वैधानिक निर्देशांचा एकत्रित विचार केला जाईल. समान किंवा जवळपास समान पात्रता व सेवास्थिती असलेल्या अधिकाऱ्यांमधून निवड करताना वस्तुनिष्ठ कार्यक्षमता मूल्यांकनाला योग्य महत्त्व दिले जाईल. विद्यमान कायदा किंवा सेवा नियमांशी विसंगती आढळल्यास संबंधित कायदा अथवा नियमाला प्राधान्य राहील.



> राज्यातील जनतेला सार्वजनिक आरोग्य सेवा अधिक दर्जेदार, गतिमान करण्यासाठी अधिकाऱ्यांचे गुणवत्ता आधारित वस्तुनिष्ठ मूल्यांकन करून मनुष्यबळाचा कार्यक्षम वापर तसेच चांगले कार्य करणाऱ्यांना प्रोत्साहन व बदली प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाने सर्व समावेशक निकष प्रणाली तयार केली आहे ,यामुळे आरोग्य सेवांची गुणवत्ता वाढण्यास मदत होईल
>
> **– प्रकाश आबिटकर**
> **मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण , महाराष्ट्र राज्य .**

आरोग्य सेवा आयुक्त तथा राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे अभियान संचालक यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय मूल्यमापन समिती काम करेल. समितीत शहरी आरोग्य आयुक्त, संबंधित संचालक, अतिरिक्त संचालक, उपसंचालक, सार्वजनिक आरोग्य विभागाचे अधिकारी, राज्य आरोग्य प्रणाली संसाधन केंद्राचे कार्यकारी संचालक आणि गुणवत्ता आश्वासन किंवा आरोग्य व्यवस्थापन क्षेत्रातील तज्ज्ञांचा समावेश असेल.

पारदर्शकता आणि एकसमानता राखण्यासाठी विभाग आवश्यकतेनुसार ऑनलाइन कार्यक्षमता मूल्यमापन प्रणाली विकसित करेल. प्रत्येक घटकाचा पुरावा, गुणांकन, मूल्यमापन करणारा अधिकारी आणि अंतिम अनुमोदन यांची डिजिटल नोंद ठेवली जाईल. संबंधित अधिकाऱ्याला गुण किंवा श्रेणीबाबत निर्धारित कालावधीत लेखी अभ्यावेदन सादर करण्याची संधी मिळेल.

‘क’ किंवा ‘ड’ श्रेणीतील अधिकाऱ्यांसाठी आवश्यकतेनुसार कार्यक्षमता सुधारणा आराखडा तयार केला जाईल. त्यामध्ये कमतरतेची क्षेत्रे, सुधारणा उपाय, मार्गदर्शन, प्रशिक्षण, कालमर्यादा आणि पुनर्मूल्यमापनाचा समावेश असेल. अशा अधिकाऱ्यांचे साधारणतः सहा ते बारा महिन्यांत पुनर्मूल्यमापन करता येईल. कामगिरी कमी असल्यास मुदतपूर्व बदली करण्याचे अधिकार शासनाकडे राहतील.

# संक्षिप्त

## स्मृती मंधाना महिला संघाची कर्णधार

**हरमनप्रीतने कर्णधारपद सोडल्यानंतर महिला क्रिकेट संघाची नवी कर्णधार कोण याची चर्चा क्रिकेट चाहत्यांमध्ये सुरु होती, अखेर याचं उत्तर भारतीय क्रिकेटच्या चाहत्यांना मिळालं आहे. स्मृती मानधना आता टीम इंडियाची नवी कर्णधार स्मृती मानधना असणार आहे.** भारतीय महिला क्रिकेट संघाची स्टार खेळाडू आणि माजी विश्वचषक विजेती कर्णधार हरमनप्रीत कौरने कर्णधारपदाची जबाबदारी सोडण्याचा निर्णय घेतला होता. तिने, भारतीय महिला संघाच्या सर्व फॉरमॅटमधील कर्णधारपदाची जबाबदारी सोडण्याचा निर्णय घेतला होता. आता तिच्यानंतर भारतीय महिला क्रिकेट संघाला नवीन कर्णधार मिळाली आहे. आतापासून भारतीय महिला क्रिकेट संघाची कर्णधार स्मृती मंधाना झाली आहे. महिला क्रिकेट संघाची नवी कर्णधार कोण याची चर्चा क्रिकेट चाहत्यांमध्ये सुरु होती, अखेर याचं उत्तर भारतीय क्रिकेटच्या चाहत्यांना मिळालं आहे. स्मृती गेल्या अनेक वर्षांपासून भारतीय महिला क्रिकेटमधील प्रमुख खेळाडूंपैकी एक आहे. तिची भारतीय महिला संघाच्या सर्व फॉरमॅटमधील प्रगती पाहता तिने महत्त्वाची भूमिका बजावली आहे. एक अनुभवी आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू म्हणून, तिने देशांतर्गत आणि फ्रँचायझी क्रिकेटमध्येही आपले नेतृत्वगुण दाखवले आहेत आणि अलीकडेच रॉयल चॅलेंजर्स बंगळूरूला २०२४ आणि २०२६ मध्ये महिला प्रीमियर लीगचे विजेतेपद मिळवून दिले आहे. (बातमी अपडेट होत आहे)




## होर्मुझच्या सामुद्रधुनीत व्यापारी जहाजावर क्षेपणास्त्र हल्ला:

### ११ भारतीय खलाशी जखमी; ओमानकडून तत्परतेने बचावकार्य

**परराष्ट्र मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, या व्यापारी जहाजावर एकूण १९ कर्मचारी तैनात होते, ज्यापैकी १७ जण भारतीय वंशाचे आहेत. हल्ल्याची माहिती मिळताच ओमानचे सुरक्षा दल आणि तटरक्षक दलाने अत्यंत वेगाने शोध व बचाव मोहीम राबवली.**

**ओमान :** ओमानच्या सागरी किनाऱ्याजवळ असलेल्या मोक्याच्या ’होर्मुझच्या सामुद्रधुनी’त प्रवास करणाऱ्या एका व्यापारी जहाजावर मंगळवारी अचानक हल्ला झाला. पनामाचा ध्वज असलेल्या ’एमटी ऑन पीस’ या जहाजावर अज्ञातांनी क्षेपणास्त्रासारख्या वस्तूने मारा केला. या दुर्घटनेत जहाजावरील १२ कर्मचाऱ्यांना दुखापत झाली असून, यामध्ये ११ भारतीय नागरिकांचा समावेश आहे. भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने (चए) या घटनेबाबत अधिकृत माहिती दिली आहे.

## नाशिक जिल्ह्यातील २६ धरणांचे दरवाजे बंद !

### ९७ टक्के पाणीसाठा, विसर्गाला पूर्णविराम

**नाशिक :** पावसाने विश्रांती घेतल्याने आणि धरणांमधील पाणीसाठा समाधानकारक स्थितीत असल्याने नाशिक जिल्ह्यातील २६ मोठ्या, मध्यम आणि लघु प्रकल्पांमधून होणारा विसर्ग थांबविण्यात आला आहे. जलसंपदा विभागाने सर्व धरणांचे दरवाजे बंद केले असून, गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या विसर्गाला अखेर पूर्णविराम मिळाला आहे. आता पिण्याच्या पाण्यासह शेतीच्या गरजेनुसारच आवश्यकतेप्रमाणे पाणी सोडले जाणार आहे.

गंगापूरसह प्रमुख धरणांमध्ये समाधानकारक साठा - जिल्हा प्रशासनाकडून सोमवारी मिळालेल्या माहितीनुसार, गोदावरी खोऱ्यातील गंगापूर धरणात ९९ टक्क्यांहून अधिक पाणीसाठा आहे. त्यामुळे धरणाचे सर्व दरवाजे बंद करण्यात आले आहेत. कश्यपी, गौतमी-गोदावरी आणि आळंदी धरणांमध्येही समाधानकारक पाणीसाठा असल्याने विसर्ग थांबविण्यात आला आहे. दारणा-वाघाड समूहातील दारणा, मुकणे, वालदेवी, वाघाड, कडवा आणि पालखेड या धरणांमधील पाण्याची पातळी स्थिरावली आहे. सध्या या धरणांमधून नदीपात्रात कोणताही विसर्ग सुरू नाही.

# पुणे-नाशिक रेल्वे बाजूला, सहमती एक्सप्रेस लोणीमार्गे जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदावर!

## विखे-थोरातांच्या सहमतीच्या राजकारणावर जनतेचा सवाल; अकोले-संगमनेरच्या प्रश्नांचे काय?



: लेखन :
**डॉ. विश्वासराव आरोटे**
कळसुबाई शिखरावरून

पुणे-नाशिक रेल्वेचा प्रश्न, दुष्काळ, पाणी, शेती आणि स्थानिक विकासाच्या प्रश्नांवरून गेल्या काही वर्षांपासून अकोले-संगमनेर परिसरातील जनतेमध्ये मोठ्या अपेक्षा निर्माण झाल्या होत्या. मात्र, आता जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर घडत असलेल्या राजकीय घडामोडींमुळे या अपेक्षांवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पुणे-नाशिक रेल्वे बाजूला ठेवून संगमनेरहून निघालेली 'सहमती एक्सप्रेस' लोणीमार्गे थेट जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदावर जाऊन पोहोचली का?, असा सवाल सामान्य नागरिकांमध्ये उपस्थित होत आहे.

संगमनेरमध्ये पुणे-नाशिक रेल्वेसाठी आंदोलने झाली, मोठमोठ्या घोषणा झाल्या, जनतेच्या भावनांना साद घालण्यात आली. मात्र, राजकीय समीकरणे बदलताच या आंदोलनांचे पुढे काय झाले, असा प्रश्न आता विचारला जात आहे. रेल्वेचा प्रश्न असो, दुष्काळाचा प्रश्न असो अथवा पाण्याचा प्रश्न असो; जनतेच्या प्रश्नांपेक्षा राजकीय पदे आणि सत्तेची समीकरणे महत्त्वाची ठरत असतील, तर सामान्य नागरिकांनी कोणाकडे पाहायचे? असा सवाल नागरिक करत आहेत.

पुणे-नाशिक रेल्वे संगमनेरमार्गे जाण्याची चर्चा असताना तिच्या मार्गाबाबत राजकीय पातळीवर वेगवेगळ्या भूमिका मांडल्या गेल्या. शिर्डीमार्गे रेल्वेचा प्रश्न पुढे गेला, तर संगमनेरच्या आंदोलनांमागील राजकीय हेतूंवरही आता चर्चा सुरु झाली आहे. जनतेला आंदोलनात उतरवायचे, घोषणा द्यायच्या, जनभावना पेटवायच्या आणि नंतर सत्तेच्या राजकारणासाठी वेगळीच समीकरणे जुळवायची, असा आरोप आता विरोधक आणि सामान्य नागरिकांच्या चर्चेतून पुढे येत आहे.

**दुष्काळाचे कारण पुढे; जिल्हा बँकेसाठी मात्र राजकीय सहमती?**

जिल्ह्यात दुष्काळाची परिस्थिती असल्याचे सांगत जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध करण्याचे आवाहन करण्यात आले. मात्र, दुष्काळ आहे म्हणून जिल्हा बँक तुम्ही घ्या, जिल्हा परिषद आम्हाला द्या; मग जनतेच्या प्रश्नांचे काय? असा बोचरा सवाल आता उपस्थित होत आहे. सत्ता आणि पदांच्या वाटाघाटींमध्ये जनतेच्या मूलभूत प्रश्नांना किती स्थान आहे, हे स्पष्ट करण्याची वेळ आली आहे.

कालपर्यंत एकमेकांवर राजकीय आरोप-प्रत्यारोप करणारे आणि एकमेकांचे वाभाडे काढणारे नेते आज अचानक एका व्यासपीठावर येऊन दुष्काळाची परिस्थिती आहे, जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध करूया, असा सूर लावत असतील, तर या सहमतीमागे नेमके जनहित किती आणि राजकीय हित किती, हा प्रश्न मतदारांना पडणे स्वाभाविक आहे.

संगमनेर येथे विखे-थोरात यांच्या भेटीगाठी झाल्या. दोन्ही बाजूंच्या जवळच्या मंडळींना एकत्र करून जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध करण्याचा प्रयत्न झाला. जिल्हा बँक म्हणजे आपली घरची बँक आहे का? असा सवाल आता सामान्य मतदारांमधून उपस्थित होत आहे. कारण, जर खरोखरच जनहिताचा विचार करून बिनविरोधाचा निर्णय होत असेल, तर जिल्ह्यातील शेतकरी, सहकारी संस्था, दूध उत्पादक, मजूर संस्था आणि सामान्य सभासद यांच्या हिताचे ठोस निर्णय आधी का घेतले जात नाहीत, असा प्रश्नही विचारला जात आहे.

**जनतेने दाखवून दिले - बिनविरोधाचा निर्णय एवढा सोपा नाही!**

दरम्यान, जिल्हा बँकेच्या निवडणुकीसाठी मोठ्या संख्येने उमेदवारी अर्ज दाखल झाल्याने बिनविरोध निवडणुकीच्या प्रयत्नांना धक्का बसला आहे. बघूया तुम्ही निवडणूक कशी बिनविरोध करता!, अशीच भावना अनेक मतदारांमध्ये असल्याचे चित्र आहे. आता जिल्हा बँकेचा अध्यक्ष आणि संचालक कोण होणार, याचा अंतिम निर्णय राजकीय बैठकीत नव्हे, तर मतदारांच्या मतपेटीतून होणार आहे.

अकोले तालुक्याच्या दृष्टीनेही या संपूर्ण राजकीय घडामोडींना विशेष महत्त्व आहे. अकोलेकरांच्या पाण्यावर नगर जिल्ह्यातील इतर भागांचा विकास साधला जात असताना अकोलेच्या हक्काच्या प्रश्नांकडे मात्र दुर्लक्ष होत असल्याची भावना अनेकदा व्यक्त झाली आहे. आमच्या पाण्यावर तुम्ही डोळा ठेवायचा, आमच्या प्रश्नांवर राजकारण करायचे आणि निवडणुकीच्या वेळी आमच्याच जनतेचा वापर करायचा, हे आता खपवून घेतले जाणार नाही, अशी भूमिका नागरिकांच्या चर्चेतून पुढे येत आहे.

**राजकारणाची पोळी जनतेच्या बळावर भाजायची किती दिवस?**

नगर जिल्ह्यातील दोन मातब्बर राजकीय नेते एकमेकांचे विरोधक असल्याचे दाखवायचे, निवडणुकीच्या काळात परस्परांवर टीका करायची आणि मात्र पदे व राजकीय हितसंबंध समोर आले की एकमेकांच्या गळ्यात गळे घालायचे, असा आरोप आता जनतेतून केला जात आहे. वैयक्तिक किंवा राजकीय लाभासाठी जनतेला हातातील बाहुले बनवून पुन्हा निवडणुकीच्या वेळी त्याच जनतेसमोर




जाण्याचे राजकारण आता बदलले पाहिजे, अशी अपेक्षा मतदार व्यक्त करत आहेत.

पुणे-नाशिक रेल्वेचा प्रश्न असो, अकोले-संगमनेरच्या पाण्याचा प्रश्न असो, दुष्काळ असो किंवा सहकार क्षेत्रातील प्रश्न असो; प्रत्येक वेळी जनतेच्या भावनांचा आधार घेऊन राजकीय समीकरणे जुळवली जात असतील, तर आता मतदारांनीही जागरूक होण्याची गरज आहे. राजकीय नेत्यांनी केलेल्या घोषणांपेक्षा त्यांनी प्रत्यक्षात जनतेसाठी काय केले, याचा हिशेब मतदारांनी मागण्याची वेळ आली आहे.

आगामी निवडणुकांमध्ये अकोले-संगमनेर परिसरातील जनता केवळ आश्वासनांना भुलणार नाही, तर कोण जनतेच्या प्रश्नांसाठी उभे राहिले आणि कोण सत्तेच्या समीकरणांसाठी जनतेचा वापर करत राहिले, याचा फैसला मतपेटीतून करेल, अशी चर्चा आता मतदारांमध्ये रंगू लागली आहे. जिल्हा बँकेच्या निवडणुकीतही सामान्य मतदारच खरा निर्णायक ठरणार असून, सहमतीच्या राजकारणाला मतदार कितपत मान्यता देतात, हे आता निवडणुकीच्या निकालातून स्पष्ट होईल, अशी भूमिका नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

## थोडक्यात पण महत्त्वाचे

### विश्व मांगल्य सभेच्या अहिल्यानगर जिल्हाध्यक्षपदी सौ.रजनी मनोज भंडारी यांची निवड

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)



अहिल्यानगर (स.गांवकरी):- पुणे येथे दि. ३ व ४ ऑक्टोबर रोजी पार पडलेल्या विश्वमांगल्य सभा,पश्चिम महाराष्ट्र प्रांताच्या वार्षिक बैठकीत अहिल्यानगर जिल्ह्यातील नवीन पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली. यामध्ये सौ. रजनी मनोज भंडारी यांची विश्वमांगल्य सभेच्या अहिल्यानगर जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली. महिला सक्षमीकरण, सामाजिक जागृती, संस्कार आणि समाजोपयोगी उपक्रमांना चालना देण्याच्या उद्देशाने संघटनेच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर जिल्ह्यात संघटनेचे कार्य अधिक व्यापक आणि प्रभावी करण्याची जबाबदारी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांवर सोपविण्यात आली आहे. यावेळी अहिल्यानगर जिल्हा संपर्क प्रमुख सौ. स्वातीशिरसुल,अहिल्यानगर जिल्हा सहसंपर्क प्रमुख सौ. स्वाती पवळे,जिल्हा सदाचार सभा संयोजिका सौ.शिल्पा भदाणे, तर सौ.रूपाली मोहिते यांची जिल्हा बालसभा संयोजिका म्हणून नियुक्ती करण्यात आली. रजनी भंडारी व नूतन पदाधिकार्यांचे सौ धनश्री विखे सह अनेकांनी अभिनंदन केले आहे.

### ॲड.एम.एन.देशमुख महाविद्यालयात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन




राजूर (समर्थ गांवकरी)

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे यांचे निर्देशानुसार ॲड.एम एन.देशमुख महाविद्यालय, राजूर येथे स्कूल कनेक्ट ३.० या संपर्क अभियानाचा शुभारंभ सोमवार दि.५ ऑक्टोबर रोजी सत्यनिकेतन संस्थेचे गुरुवर्य रा.वि. पाटणकर सर्वोदय विद्यामंदिर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय राजूर येथील इ.१२ वी कला, वाणिज्य व विज्ञान विद्यालयातील २७५ विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत करण्यात आला .या अभियानाचा उद्देश म्हणजे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार झालेले अमुलाग्र बदल हा होता. स्कूल कनेक्ट ३.० संपर्क अभियान मध्ये छएझ २०२० या बद्दल या अभियानाचे समन्वयक प्रा. डॉ. एल. बी. काकडे यांनी पी. पी.टी द्वारे विद्यार्थी व शिक्षक यांना सविस्तर माहिती दिली.यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांनी महाविद्यालयातील विविध विभागांना भेटी देऊन माहिती मिळवली.महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.रावसाहेब ननावरे यांनी कार्यक्रमाचे प्रास्तविक करून उपस्थितांचे स्वागत केले.हे जागृती अभियान ५ ते १२ऑक्टोबर २०२६ या कालावधीत सुरू राहणार असून यामध्ये स्वामी समर्थ कन्या विद्यालय, मधुकरराव पिचड माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय राजूर, शासकीय आश्रमशाळा खडकी, श्री. सरस्वती उच्च माध्यमिक विद्यालय, धामणगाव पाट , डॉ. राजेंद्र प्रसाद उच्च माध्यमिक विद्यालय शेणीत , सर्वोदय उच्च माध्यमिक विद्यालय खिरविरे हे सहभागी होणार आहेत अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो.डॉ. भाऊसाहेब देशमुख यांनी दिली.

## जिल्हा बँकेच्या निवडणुकीसाठी आमदार अक्षय कर्डिलेंचा यांचा उमेदवारी अर्ज दाखल

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत भाजपचे आमदार अक्षय कर्डिले यांनी आज उमेदवारी अर्ज दाखल केला.यावेळी भाजपाचे राज्य उपाध्यक्ष सुजय दादा विखे पाटील,आमदार संग्राम जगताप,आमदार पाचपुते, भाजपाचे जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, बाजार समितीचे व्हाईस चेअरमन रभाजी सूळ,संभाजी लोंढे,संदीप कर्डिले,महायुतीचे पदाधिकारी यांच्यासह विविध गावचे सरपंच,ज्येष्ठ नेते मंडळी, मतदार,सोसायटीचे चेअरमन व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अर्ज दाखल करण्यास साठी घरी प्रथम त्यांनी कर्डिले साहेबांच्या प्रतिमेसमोर नतमस्तक झाले नंतर आई व पत्नीने त्यांचे औक्षण केले.घरून निघाल्यावर बाजार समितीमध्ये त्यांनी शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचा अभिवादन केलं.यावेळी त्यांनी कार्यकर्त्यांना संबोधित केले,तिथून ते पायी सारसनगर येथील निवडणूक कार्यालयात अर्ज दाखल करण्यासाठी कार्यकर्त्यांसह गेले, तेथे प्रथम कार्यकर्त्यांनी आमदार शिवाजीराव कर्डिले यांचे पूजन केले यावेळी कार्यकर्त्यांनी शिवाजी कर्डिले अमर रहे च्या घोषणा दिल्या.

उमेदवारी अर्ज दाखल करताना अक्षय कर्डिले यांनी आपले वडील तथा दिवंगत आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्याप्रमाणेच वेशभूषा परिधान केली. त्यामुळे उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या निमित्ताने शिवाजीराव कर्डिलेंच्या आठवणींना उजाळा मिळाला.दिवंगत शिवाजीराव कर्डिले यांनी तब्बल २५ वर्षांच्या राजकीय प्रवासात शेतकरी, सहकार आणि ग्रामीण भागातील प्रश्नांवर काम करत आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली. त्यांच्या राजकीय प्रवासाची आणि कार्यपद्धतीची आठवण करून देणारी वेशभूषा परिधान करून अक्षय कर्डिले यांनी जिल्हा बँकेच्या निवडणुकीच्या मैदानात पाऊल ठेवले. यावेळी बोलताना अक्षय



कर्डिले म्हणाले जिल्हा बँकेच्या माध्यमातून शेतकरी आणि सर्वसामान्यांसाठी काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. माझ्या वडिलांनी ज्या पद्धतीने काम केले, त्याच पद्धतीने जिल्हा बँकेच्या माध्यमातून पुढील काळात काम करण्याचा माझा प्रयत्न राहील,असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## तुळजाभवानी मातेच्या पलंगाचे शुक्रवार दि ९ ऑक्टोबरला नगरला आगमन

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)



नगरमधील सबजेल चौकातील पलंगे कुटुंब मानकरी असलेल्या व सुमारे ८०० वर्षाची परंपरा असलेल्या श्री तुळजाभवानी मातेच्या पलंगाचे आगमन नगर शहरात बोल्हेगाव, केडगाव, निबळक मार्गे भूतकर वाडीतील ताठे मळ्यात शुक्रवार दि ९ ऑक्टोबरला नगरला आगमन होणार आहे अशी माहिती पलंगाचे मानकरी गणेश पलंगे यांनी दिली आहे.

पुणे जिल्ह्यातील जुन्नर येथून पलंग निघाल्यावर सध्या पारनेर तालुक्यात आहे.तेथून तो नगर तालुक्यात येऊन ९ ऑक्टोबर पासून ४ दिवस मुक्काम नगरला राहणार आहे. महाराष्ट्राचे कुलदैवत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आई तुळजाभवानी मातेच्या पलंगाचे गावोगावी संबळ व तुणतुण्याचा निनादात, पुष्पवृष्टी करत भक्तिमय वातावरणात जंगी स्वागत करून मिरवणूक काढण्यात येत आहे,मोठ्या संख्नेने भाविक मोठ्या सहभागी होत असून दर्शनाला गर्दी करत आहे तर मुक्कामाच्या ठिकाणी विविध धार्मिक कार्यक्रम देवीचा गोंधळ व भक्तिगीते ,भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात येत आहे.

नवरात्रोत्सवा निमित्त पुणे जिल्ह्यातील घोडेगाव येथून पलंगाचे प्रस्थान होते.घोडेगाव ते तुळजापूर हा सुमारे ५० दिवसांचा पायी प्रवास करण्याची परंपरा पलंगे घराण्याने आजही अखंडपणे जपली आहे, अहिल्यानगर हे आई तुळजाभवानी मातेचे माहेर मानले जाते.

नवरात्रातील तिसऱ्या माळेला राहुरीहून येणाऱ्या पालखी व पलंगाची भव्य भेट मिरवणूक भिंगार येथे होत असून जानकोजी भगत (देवकर) यांच्या परंपरेनुसार हा सोहळा आजही सुरू आहे.

शनिवारी दुसऱ्या दिवशी पलंग नगरमधील भूतकरवाडी, बालिकाश्रम रोड,गायकवाड कॉलनी हडको कॉलनी येथे दुपारी थांबून पुढे तारकपूर,लालटाकी,दिल्लीगेट येथे फिरून नालेगाव येथील नवग्रह मंदिरात मुक्कामी राहणार आहे, तर तिसऱ्या दिवशी शहरातील तोफखाना, चितळेरोड भागात फिरून सबजेल चौकातील तुळजाभवानी मंदिरात थांबणार आहे.

## जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीत शिवसेनेची जोरदार एन्ट्री



अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

**प्रशांत लोखंडे यांनी अनुसूचित जाती जमाती मधून उमेदवारी अर्ज केला दाखल**

शिवसेना मुख्यनेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेबांच्या आदेशानुसार मा खासदार सदाशिव लोखंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रशांत सदाशिव लोखंडे यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आला यावेळी शिवसेना आमदार अमोल खताळ, आमदार विठ्ठलराव लंघे पाटील, जिल्हाप्रमुख रावसाहेब खेवरे, बाबुशेठ टायरवाले, डॉ अजित वाळे पाटील, उपजिल्हाप्रमुख रमेश काळे,दादासाहेब कोकणे, कैलास भणगे,संजय वाकचौरे,भगवानराव गंगावणे,यांच्यासह शिवसेना पक्षाचे शेकडो पदाधिकारी उपस्थित होते.

## 'आमदार अक्षय कर्डिले झाले भावनाविवश'

### आ.अक्षय कर्डिले यांचे जिल्हा बँकेत उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी मार्केट कमिटी मध्ये साधला संवाद

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

मी जन्मलो तुमच्या सर्वांसाठी, तुमच्या सर्वांमध्ये,माझ्या जन्मापासून तुम्ही माझ्याबरोबर, माझा शेवटही साहेबांसारखा तुमच्या मध्येच... मी तुमचे ऋण कधीच फेडू शकत नाही, साहेबाप्रमाणे तुम्ही माझ्यावर प्रेम करत असे म्हणत आमदार अक्षय कर्डिले झाले भावना विवश झाले.

आ.अक्षय कर्डिले यांचे जिल्हा बँकेत उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी मार्केट कमिटी मध्ये संवाद साधला. त्यावेळी ते बोलत होते.बाजार समितीचे व्हाईस चेअरमन रभाजी सूळ प्रास्तविकात म्हणाले आपण निवडून आला आहेत असे समजा आपल्या मागे साहबांचे आशीर्वाद व सर्व जेष्ठ नेते कार्यकर्ते मतदार आपल्या बरोबर आहेत असे म्हणून त्याचा सत्कार करण्यात आला यावेळी अनेक जेष्ठ नेते , मतदार, विविध गावाचे सरपंच, चेअरमन उपस्थित होते. आ. कर्डीले पुढे म्हणाले कर्डिले साहेबांचा सहकाराचा वारसा आता शेतकऱ्यांच्या हाती आहे १५ वर्षापुरी जेव्हा साहेब संचालक व २ वेळा चेअरमन झाले त्यावेळी





शेतकरी,बचत गट, सोसायटी कर्ज यावर प्रामुख्याने लक्ष देऊन त्यांना मदत केली हाती त्यान्च्याप्रमाणे मी शेतकऱ्यांसाठी जिल्हा बँकेतून काम करण्याचा संकल्पकेला आहे व अर्ज भरत आहे. आमदार अक्षय कर्डिले जिल्हा सहकारी बँक निवडणुकीत त्यांच्या उमेदवारीकडे केवळ राजकीय निवडणूक म्हणून नव्हे, तर शेतकऱ्यांशी जोडलेल्या सहकाराच्या माध्यमातून काम करण्याची संधी म्हणून पाहिले जात आहे. आमदार अक्षय कर्डिले यांचे वडील स्वर्गीय आ शिवाजीराव कर्डिले यांनी यापूर्वी जिल्हा बँकेच्या माध्यमातून सहकार क्षेत्रात काम केले होते. शेतकरी हा सहकार व्यवस्थेचा केंद्रबिंदू मानत त्यांनी जिल्ह्यातील शेतकऱ्यांना बँकिंग सुविधांबरोबरच विविध योजना आणि आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न केले.

# नागवडे कारखाना ऊस भावात मागे राहणार नाही अध्यक्ष राजेंद्र दादा नागवडे

## सन २०२६ २७ च्या ५२ व्या गाळप हंगामाचा शुभारंभ संपन्न




**श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)**

सहकार महर्षी नागवडे कारखाना ऊस भावात यापुढे मागे राहणार नाही, उर्वरित मागील गाळपाचे दीडशे रुपये दिवाळीला ऊस उत्पादकांच्या बँक खात्यावर वर्ग करणार असल्याची माहिती नागवडे कारखान्याचे अध्यक्ष राजेंद्र दादा नागवडे यांनी सांगितले. कारखान्याच्या सन २०२६ –२७ च्या ५२ व्या गळीत हंगामाचा शुभारंभ जिल्हा बँकेच्या संचालिका सौ अनुराधाताई नागवडे यांच्या शुभहस्ते तर कारखान्याच्या जेष्ठ पाच श्री व सौ सभासदांच्या प्रमुख उपस्थित गव्हाणीचे पूजन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नागवडे कारखान्याचे अध्यक्ष राजेंद्र दादा नागवडे हे होते.

प्रस्ताविकात नागवडे कारखान्याचे ज्येष्ठ संचालक सुभाष काका शिंदे यांनी मागील गाळपाची स्थिती व चालू हंगामाच्या ऊस गाळपाची पार्श्वभूमी समोर मांडत ऊस उत्पादकांनी ऊस गाळपाची घाई न करता नागवडे कारखान्यालाच ऊस द्यावा असे आवाहन केले. यावेळी कारखान्याचे उपाध्यक्ष सौ मेघाताई औटी माजी व्हाईस चेअरमन भगवानराव पाचपुते, गणेश बेरड, ज्योती खेडकर, युवा नेते दिग्विजय नागवडे, सुरेश लोखंडे, किसन नलगे, संजय शेळके, राजेंद्र भोस, अशोक काळाने, ॲड सुनील भोस, राम नागवडे, छबुराव घाडगे यांच्यासह आजी माजी संचालक कार्यकारी संचालक प्रवीण शिंदे सर्व खाते प्रमुख यावेळी उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना श्री भगवानराव पाचपुते यावेळी म्हणाले की, आजच्या स्थितीला साखर कारखान्यांसमोर मोठे आव्हान तेवढेच उत्पादकांवर देखील दुष्काळाचे सावट आहे. यापूर्वी या कारखाना कार्यक्षेत्रात भरगच्च पिके दिसत होती. परंतु रोगांचा प्रादुर्भाव मुळे पिकांचे नुकसान होत आहे. त्यामुळे शेतकरी मोठ्या चिंतेत आहेत. असे सांगून श्री पाचपुते पुढे म्हणाले की, कारखान्याचे अध्यक्ष राजेंद्र दादा नागवडे यांना सहकार महर्षी बापूंचा मोठा वारसा लाभला आहे. बापूंच्या नंतर राजेंद्र दादांनी सहकार चळवळ मोठ्या जिद्दीने काटकसरीने चालवली. त्यामुळेच कारखाना सुस्थितीत आहे. ही सहकारी कामधेनु टिकवायचे असेल तर सभासद, ऊस उत्पादकांनी देखील सहकारी संस्थेबाबत सकारात्मक दृष्टिकोन ठेवला पाहिजे. सहकार महर्षी बापूंनी ही सहकारी कामधेनु मोठ्या संघर्षातून उभी केली आहे. आज आपणा सर्वांची या संस्थेविषयी भावना चांगली असायला हवी. राज्यात अनेक सहकारी साखर कारखाने बंद पडले, परंतु नागवडे कारखाना काटकसरीच्या कारभारामुळे भक्कमपणे सभासदांच्या विश्वासावर चालवला जात आहे. सभासदांनी घाई न करता नागवडे कारखान्याला ऊस द्यावा असे आवाहन श्री पाचपुते यांनी केले आहे.

यावेळी कारखान्याचे माजी संचालक आबासाहेब कोल्हटकर व घोडगंगेचे माजी संचालक राम अण्णा नागवडे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले

अध्यक्षीय भाषणात नागवडे कारखान्याचे अध्यक्ष राजेंद्र नागवडे यांनी कारखान्याचे संस्थापक सहकार महर्षी बापूंना विनम्र अभिवादन करत म्हटले आहे की, सरकारने १५ ऑगस्ट पर्यंत कारखाने सुरू करण्याचे धोरण ठेवले आहे. त्यानुसार आज या कारखान्याच्या ५२ व्या गाळपाचा शुभारंभ होत आहे. असे सांगून श्री नागवडे आणखी पुढे म्हणाले की, राज्यातील दुष्काळी स्थितीमुळे सर्व शेतकरी चिंताग्रस्त आहेत. पावसाने पाठ फिरवल्यामुळे घोड आणि कुकडीची एकच आवर्तने सुटणार आहेत. याचा पुढील कारखान्यांच्या गाळप हंगामावर मोठा दुर्गामी परिणाम होणार आहे. गाळप हंगामामध्ये जास्तीत जास्त उसाचे गाळप झाले तर चांगल्या प्रकारे ऊस भाव देता येतो. चालू वर्षी जानेवारी फेब्रुवारी– २७ पर्यंत सर्व उसाचे गाळप केले जाईल, असे सांगून श्री नागवडे आणखी पुढे म्हणाले की, साखर उत्पादन कमी झाले तर रिकवरी देखील कमी होते. त्यामुळे ऊस भावात अडचणी येतात. साखरेचे भाव देखील कडाडणार आहेत. सहकारी साखर कारखान्यांना शासनाच्या बंधनातून वाटचाल करावी लागते. त्यामध्ये शासनाने साखर कारखान्यांना महिन्यातून चार वेळा साखर विक्रीची बंधने घातली आहेत. साधारणतः कारखाना कार्यक्षेत्रात जवळपास २० ते २२ लाख मे.टन ऊस उत्पादन असताना नागवडे कारखान्याला फक्त पाच लाख टन ऊस मिळतो. अशी खंत व्यक्त करत श्री नागवडे पुढे म्हणाले की, साखर कारखानदारी ही उसावर चालते. अशा परिस्थितीत सभासद ऊस उत्पादकांनी आपलीच कामधेनू समजून जास्तीत जास्त नागवडे कारखान्याला ऊस देऊन सहकार्य करावे, नोंदीप्रमाणे उसाचे पूर्ण गाळप झाल्याशिवाय कारखाना बंद होणार नाही, अशी ग्वाही देखील श्री नागवडे यांनी यावेळी दिली. यावेळी सभासद ऊस उत्पादक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन संचालक सुभाषराव शिंदे यांनी केले. तर आभार संचालक शरदराव जगताप यांनी मानले.

## थोडक्यात पण महत्वाचे

### शेडगाव ग्रामपंचायत कार्यालयाच्या नवीन इमारतीचे भूमिपूजन



**श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)**

शेडगाव (ता. श्रीगोंदा) येथे ग्रामपंचायत कार्यालयाच्या नवीन इमारतीच्या भूमिपूजन समारंभाचे आयोजन मंगळवारी (दि. ६ ऑक्टोबर) सकाळी करण्यात आले. पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि आमदार विक्रमसिंह बबनराव पाचपुते यांच्या मार्गदर्शनातून ग्रामपंचायत कार्यालयासाठी ४० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन भूमिपूजनाचा कार्यक्रम साध्या पद्धतीने आयोजित करण्यात आला. नवीन ग्रामपंचायत कार्यालयामुळे ग्रामस्थांना विविध शासकीय कामांसाठी अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. या वेळी सावता परिषदेचे प्रदेश महासचिव तथा माजी सरपंच विजय शंकरराव शेडे, लक्ष्मणराव रसाळ, भीमराव बेलेकर, डॉ. जांभळे, शांताराम गोरे, किसन बेलेकर, विजय रसाळ, शाहुराज भोपळे, नानासाहेब शिंदे, शिवराज राजेभोसले, अमोल भोपळे, बिभीषण राऊत, बालाजी भोसले, डॉ. अमोल झेंडे, विलास रणसिंग, धनराज भोपळे, पोपटराव राऊत, डॉ. गिरमे, राजू खुडे, सचिन गोरे यांच्यासह ग्रामविकास अधिकारी शिंदे मॅडम, प्रशासक, विस्तार अधिकारी मांढरे साहेब तसेच ग्रामस्थ उपस्थित होते. दुष्काळी परिस्थितीत साधेपणाने भूमिपूजन करत गावाच्या विकासासाठी मंजूर झालेल्या निधीतून सुसज्ज ग्रामपंचायत कार्यालय उभारण्याच्या कामाला आता सुरुवात झाली आहे.

### मोफत आरोग्य तपासणी व सर्पदंश जनजागृती अभियान संपन्न

**जुन्नर (समर्थ गांवकरी)**

मंगळवार दि:–,०६ ऑक्टोबर रोजी शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा सोनावळे ता:– जुन्नर जिल्हा पुणे या शाळेत लायन्स क्लब ऑफ शिवनेरी व विघ्नहर नर्सिंग होम नारायणगाव यांचे संयुक्त विद्यमाने आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर व सर्पदंश जनजागृती अभियान हा उपक्रम घेण्यात आला.यामध्ये इयत्ता पहिली ते बारावीच्या विद्यार्थ्यांची मोफत तपासणी करण्यात आली तसेच राष्ट्रीय सर्पदंश तांत्रिक सल्लागार समिती सदस्य व जागतिक आरोग्य संघटनेचे सदस्य शिवनेरीभूषण डॉ. सदानंद राऊत यांनी मुलांना सर्पदंश विषयी माहिती दिली. यामध्ये आपल्या भागात आढळणाऱ्या विषारी व बिन



विषारी सापांच्या विविध जाती कोणकोणत्या आहेत? विषारी व बिनविषारी साप कसा ओळखायचा?सर्पदंश होऊ नये म्हणून कोण कोणती काळजी घेतली पाहिजे व सर्पदंश झाल्यानंतर योग्य उपचार कसा केला जातो किंवा सर्पदंश झालेल्या व्यक्तीची किंवा रुग्णाची काळजी कशी घेतली जावी याबाबत स्वतःचे अनुभव सांगून माहिती दिली यावेळी व्हेनॉम वॉरियर्स हा माहितीपट दाखविण्यात आला. शाळेचे मुख्याध्यापक श्रीमती गुंड यांनी उपस्थित मान्यवरांचा शाळेच्या वतीने सन्मान केला तसेच लायन्स क्लबचे वतीने देखील शाळे तील शिक्षकांचा सन्मान करण्यात आला या कार्यक्रमा साठी डॉक्टर सदानंद राऊत डॉक्टर विलास नायकोडी सचिन भोर,प्रशांत शिंदे प्रवीण रोकडे,नंदु अडसरे वैद्यकीय अधिकारी डॉ.स्वाती घोरपडे व त्यांची संपूर्ण टीम शाळेचे सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते या कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी शाळे चे अधीक्षक गेजगे सर आणि अधिक्षिका श्रीमती रजपूत मॅडम यांनी विशेष कष्ट घेतले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रवीण गाढवे सर यांनी केले तर आभार प्रदर्शन महादेव ठोंबरे सरांनी केले.

# कन्या विद्यालयाच्या तायक्कांदोपटू विभाग स्तरावर

### तालुका व जिल्हास्तरावर यश मिळवून विभागीय स्पर्धेसाठी सज्ज

**श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)**

शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या वतीने क्रीडा व युवक सेवा संचलनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय अहिल्यानगर यांच्या वतीने आयोजित शालेय तायक्कांदो क्रीडा स्पर्धा २०२६–२७ मध्ये रयत शिक्षण संस्थेच्या श्रीमंत राजमाता विजयाराजे शिंदे कन्या विद्यालयाच्या तायक्कांदो खेळाडूंनी तालुका व जिल्हास्तरावर उत्कृष्ट कामगिरी करत आपल्या विद्यालयाचे नाव उज्वल केले. जिद्द, मेहनत, शिस्त आणि सातत्यपूर्ण सरावाच्या जोरावर मुलींनी विविध वजनगटांत चमकदार कामगिरी करत पदके मिळवली.

तालुकास्तरावर पटकावली १० सुवर्ण, ४ रौप्य आणि ७ कांस्य पदके.

१५ सप्टेंबर रोजी श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय येथे तालुकास्तर स्पर्धा झाल्या.

सुवर्णपदक विजेत्या – १४ वर्षे वयोगट – आरोही गारुडकर ऋतिका दातीर शौर्य नाईक भक्ती चाकणे यांनी तर १७ वर्षे वयोगट – श्रेया आळेकर, भार्गवी सोनवणे, स्नेहल गवांदे, ज्ञानेश्वरी खेडकर, वैष्णवी चौधरी, मनस्वी ढवळे यांनी सुवर्णपदक पटकावले. या खेळाडूंची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली.

रौप्य पदक विजेत्या – भक्ती गोरे, स्वराली अस्वर, शुभ्रा मस्के, समृद्धी खेडकर.

कांस्य पदक विजेत्या – शिरीन ससाने, स्वराली फडताळे, संस्कृती खेडकर, कार्तिकी निंबाळकर, आर्या गाडगे, वैष्णवी बोराडे, वैष्णवी भुजबळ.

जिल्हास्तरावर पटकावली ८ पदके.

२३ व २४ सप्टेंबर दरम्यान महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालय येथे संपन्न झालेल्या जिल्हास्तर तायक्कांदो क्रीडा स्पर्धेमध्ये ऋतिका दातीर व ज्ञानेश्वरी खेडकर यांनी सुवर्णपदक पटकावून पुणे विभागीय स्पर्धेसाठी आपली निवड पक्की केली.



याबरोबरच भार्गवी सोनवणे व मनस्वी ढवळे यांनी रौप्यपदक तर शौर्या नाईक, भक्ती चाकणे, स्नेहल गवांदे, श्रेया आळेकर यांनी कांस्यपदकाचा मान मिळवला.

या यशामुळे विद्यालयातील मुलींच्या क्रीडा कौशल्याला, आत्मविश्वासाला आणि स्वसंरक्षणाच्या क्षमतेला नवी दिशा मिळाली आहे. तायक्कांदोच्या माध्यमातून मुलींमध्ये शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच धैर्य, निर्णयक्षमता आणि आत्मविश्वास विकसित होत असल्याचे या यशातून दिसून आले.सर्व खेळाडूंना विद्यालयाचे क्रीडा विभाग प्रमुख प्रा. किरण कोकणी यांच्यासह जयेश व सिद्धेश आनंदकर यांचे मार्गदर्शन लाभले.

यादेदीप्यमान कामगिरीबद्दल मॅनेजिंग कौन्सिल सदस्य बाबासाहेब भोस, जनरल बॉडी सदस्य, श्री कुंडलिकरावजी दरेकर, श्री गणेश भोस, विभागीय अधिकारी श्री.नवनाथ बोडखे,मुख्याध्यापिका वर्षा भोईटे पर्यवेक्षक श्री बाळासाहेब शिंदे गुरुकुल प्रमुख श्री किरण शिंदे व सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व ग्रामस्थ यांच्याकडून कौतुक होत आहे...

# 'महादजी'च्या शौर्य होले, विजया शेलार यांना 'रयत' चा आदर्श पुरस्कार

**श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)**





रयत शिक्षण संस्थेच्या १०७ व्या वर्धापनदिनानिमित्त प्रदान करण्यात येणाऱ्या मानाच्या पुरस्कारांमध्ये श्रीगोंदा येथील महादजी शिंदे विद्यालय व ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्सने यंदाही उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विद्यालयातील विद्यार्थी रुद्र रविंद्र होले यास मा. दादा पाटील आदर्श विद्यार्थी पुरस्कार, तर विद्यालयातील विज्ञान–गणित विषयाच्या शिक्षिका श्रीम. विजया दिलीप शेलार यांना मा. शंकरराव देवराम काळे आदर्श विज्ञान–गणित आदर्श शिक्षिका पुरस्कार प्रदान करण्यात आला.

रयत शिक्षण संस्थेच्या वर्धापनदिनानिमित्त ४ ऑक्टोबर रोजी समाधी परिसर, सातारा येथे झालेल्या पुरस्कार वितरण समारंभात हे पुरस्कार प्रदान करण्यात आले. रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, मॅनेजिंग कौन्सिल सदस्या खा. सुप्रिया सुळे, उपाध्यक्ष ड. भगीरथ शिंदे व सचिव किशोरराजे निंबाळकर यांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण झाले.

या उल्लेखनीय यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य बाबासाहेब भोस, जनरल बॉडी सदस्य बबनराव पाचपुते, राहुल जगताप, गणेश भोस, विभागीय अधिकारी नवनाथ बोडखे, सहाय्यक विभागीय अधिकारी प्रमोद तोरणे, नायकवडी माध्यमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष सचिन झगडे यांच्यासह विविध मान्यवरांनी पुरस्कारार्थींचे अभिनंदन केले.

विद्यालयाचे प्राचार्य दिलीप भुजबळ, उपमुख्याध्यापक शहाजी एकाड, पर्यवेक्षिका सुनीता काकडे, गुरुकुल प्रमुख बापू जाधव, गुणवत्ता कक्ष प्रमुख सुधीर साबळे तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मार्गदर्शन आणि सहकार्य लाभले.

# आहुपे आश्रमशाळेत वन्यजीव सप्ताह उत्साहात साजरा!







**आहुपे (समर्थ गांवकरी)**

शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा, आहुपे येथे शनिवार, दि. ३ ऑक्टोबर २०२६ रोजी वन्यजीव सप्ताह उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी वन विभागाचे कर्मचारी, वनपाल श्रीमती वाघमारे मॅडम, शिक्षकवृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. वनपाल श्रीमती वाघमारे यांनी वन्यजीव सप्ताहाचे महत्त्व सांगताना जंगल, वन्यजीव आणि पर्यावरणाचे मानवी जीवनातील महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.

वन्यजीव व पर्यावरण संवर्धनाबाबत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती निर्माण व्हावी, यासाठी निबंध व चित्रकला स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धांमध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी बक्षिसांचीही व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष जंगलाची ओळख व्हावी आणि वन्यजीव व निसर्गाबाबत त्यांच्यामध्ये अधिक कुतूहल निर्माण व्हावे, यासाठी जंगल सफारीचे आयोजन करण्यास वन विभागाने मान्यता दिली आहे.

कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना पर्यावरण, जंगल व वन्यजीवांशी संबंधित विविध प्रश्न विचारून त्यांच्या ज्ञानात भर घालण्यात आली. तसेच जंगलाचे संरक्षण, वन्यजीवांचे संवर्धन आणि पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रत्येकाने योगदान द्यावे, असे आवाहन करण्यात आले. वन्यजीव सप्ताहाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये निसर्गप्रेम व पर्यावरण संवर्धनाची भावना निर्माण होत असल्याचे विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. सुरेश हुले यांनी सांगितले.

# भीमाशंकरच्या सभासद, ऊस उत्पादक साखर वाटप धोरणात बदल

**मंचर (समर्थ गांवकरी)**

दत्तात्रयनगर, पारगाव (ता. आंबेगाव) येथील भीमाशंकर सहकारी साखर कारखान्यामार्फत दिपावलीनिमित्त सभासद व ऊस उत्पादक शेतक–यांना वाटप करण्यात येणा–या साखरेच्या धोरणात बदल करून दुष्काळी परिस्थितीमुळे कारखान्याचे संस्थापक माजी सहकारमंत्री दिलीप

वळसे पाटील यांचे सुचनेनुसार शेतक–यांच्या भावना लक्षात घेऊन गतवर्षाप्रमाणेच साखर वाटप करण्यात येणार असल्याची माहिती कारखान्याचे अध्यक्ष बाळासाहेब बेंडे यांनी सोमवारी सायंकाळी दिली.

पारगाव कारखाना येथील झालेल्या पत्रकार परिषदेला

कारखान्याचे संचालक बाबासाहेब खालकर, बाळासाहेब घुले, रामचंद्र ढोबळे, मच्छिंद्र गावडे, आनंदराव शिंदे अंकित जाधव, ज्ञानेश्वर अस्वारे, कारखान्याचे कार्यकारी संचालक चंद्रकांत ढगे, सचिव रामनाथ हिंगे उपस्थित होते.

साखर धोरणाबाबत माहिती देताना बेंडे म्हणाले की साखरेचे वाटप कारखान्याचे भागधारक व गाळप हंगाम २०२५–२६ मध्ये ऊस पुरविलेला आहे यांचेसाठी राहील. त्यामध्ये (१) पूर्ण व अपूर्ण शेअर्स रक्कम जमा केलेले व ऊस पुरवठा केलेले – ८० किलो (२) फक्त पूर्ण शेअर्स (रु. १५,०००/–) रक्कम जमा केलेले – ६० किलो (३) फक्त ऊस पुरवठा केलेले – ६० किलो (४) अपूर्ण शेअर्स रक्कम जमा केलेले – ५० किलो याप्रमाणे खालील तारखेनुसार गावोगावी १०, २० व ५० किलो पॅकींगमध्ये साखर वाटपाचे नियोजन केलेले आहे. आजपर्यंत पारगाव, निरगुडसर, जांबूत, कळंब, रांजणी, मंचर गटातील गावामध्ये साखर वाटप झालेले आहे. तथापी दि. ६ ते दि. १० ऑक्टोबर कालावधीतील नियोजित साखर वाटप पूर्ण झाल्यानंतर दि. ११ ते १५ ऑक्टोबर कालावधीत वाटप झालेल्या गटातील गावांमध्ये साखर वाटप करण्यात येईल.

मंगळवार दि. ६ – घोडेगाव गटातील सर्व गावे,

बुधवार दि. ७ – टाकळी हाजी, कवठे व करंदी गटातील सर्व गावे,

गुरुवार दि. ८ – करंदी गटातील गावांसाठी गट ऑफिस,

शुक्रवार दि. ९ – जातेगाव, भोरवाडी, निमगाव सावा, नारायणगाव गट,

ओझर, उंब्रज या गटातील गावांसाठी गट ऑफिस येथे,

खोडद व पारगाव (मंगरूळ) गाव येथे,

शनिवार दि. १० – जातेगाव बु, भोरवाडी, निमगाव सावा, नारायणगाव

अंतर्गत सबंधित साखर वाटप गावांसाठी गट ऑफिस येथे व

खेड गटातील गावांसाठी मार्केट यार्ड खेड येथे,

रविवार दि. ११ – पारगाव गटातील सर्व गावे,

मंगळवार दि. १३ – पारगाव गाव, निरगुडसर व जांबूत गटातील सर्व गावे,

बुधवार दि. १४ – निरगुडसर गाव, कळंब व रांजणी गटातील सर्व गावे,

गुरुवार दि. १५ – मंचर गटातील सर्व गावे,

जे सभासद / ऊस उत्पादक वरील नियोजीत कालावधीत आपआपले गावामधून साखर घेवू शकणार नाहीत त्यांना साखर शुक्रवार दि. १६ ऑक्टोबर ते शनिवार दि. ३१ ऑक्टोबर २०२६ या कालावधीमध्ये कारखाना साईटवर सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत (गुरुवार व शासकीय सुट्टीचे दिवस वगळून) वाटप



केली जाणार आहे. त्याशिवाय राहिलेल्या सभासद व ऊस उत्पादकांना सप्टेंबर २०२७ पर्यंत कारखाना साईटवर सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत (गुरुवार व शासकीय सुट्टीचे दिवस वगळून) साखर वाटप करण्यात येणार आहे. नियोजीत साखर वाटप तारखेला साखर घेताना सभासद व ऊस उत्पादकांनी त्यांना दिलेले स्मार्ट कार्ड व ओळखीचा पुरावा सोबत आणणे आवश्यक आहे. तरी वरील नमूद तारखेला सभासद व ऊस उत्पादकांनी साखर घेवून जाणेचे सहकार्य करावे. वरील धोरण चालू वर्षाकरिताच मर्यादित आहे. सर्व शेअर्स धारकांना विनंती आहे की आपले शेअर्सची अपूर्ण रक्कम कारखान्याकडे जमा करावी. अन्यथा पुढील वर्षी धोरणामध्ये बदल करावा लागेल असे आवाहन कारखान्याचे अध्यक्ष बाळासाहेब बेंडे यांनी केले. छायाचित्र मजकूर भीमाशंकर कारखान्याच्या वतीने झालेल्या पत्रकार परिषदेत बोलताना अध्यक्ष बाळासाहेब बेंडे

## थोडक्यात पण महत्त्वाचे

### पाथर्डीत नवनियुक्त पोलीस निरीक्षक नितीन कंडारे यांचे जंगी स्वागत

**वंचित बहुजन आघाडीतर्फे सत्कार**



**पाथर्डी (समर्थ गांवकरी)**

पाथर्डी पोलीस स्टेशन येथे नव्याने नियुक्त झालेले पोलीस निरीक्षक श्री. नितीन कंडारे यांचा वंचित बहुजन आघाडी तसेच फुले-शाहू-आंबेडकर विचारधारेच्या कार्यकर्त्यांच्या वतीने उत्साहात सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी पोलीस निरीक्षक कंडारे यांना त्यांच्या पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. सत्कारप्रसंगी उपस्थित कार्यकर्त्यांनी पाथर्डी शहर व तालुक्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तसेच सर्वसामान्य नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी पोलीस प्रशासनाने प्रभावीपणे काम करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष पप्पू शेठ बोर्डे, महेंद्र राजगुरू, दिगंबर गाडे, एकनाथ ठोकळ, दिलीप सरसे, बाळासाहेब पांडागळे, श्रीधर दौंडे, भारतीय बौद्ध महासभेचे अध्यक्ष श्रीपत बळीद दादा, आकाश शिंदे, नितीन पवार, म हेश अंगरख यांच्यासह वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते व विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. नवनियुक्त पोलीस निरीक्षक नितीन कंडारे यांनी सत्काराबद्दल सर्वांचे आभार मानत पाथर्डी तालुक्यात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी नागरिकांच्या सहकार्याने प्रामाणिकपणे काम करण्याचा विश्वास व्यक्त केला.

### आव्हाड महाविद्यालयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ वेटलिफ्टिंग स्पर्धा संपन्न



**पाथर्डी (समर्थ गांवकरी)**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व बाबुजी आव्हाड महाविद्यालय, पाथर्डी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतरविभागीय मुलींच्या वेटलिफ्टिंग स्पर्धा महाविद्यालयाच्या इनडोअर स्टेडियममध्ये उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाल्या.या स्पर्धेचे उद्घाटन मैत्रेय ग्रुपच्या अध्यक्षा कविताताई आव्हाड यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बबन चौरे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्रतिनिधी डॉ. राहुल भोसले, अहिल्यानगर जिल्हा वेटलिफ्टिंग असोसिएशनचे अध्यक्ष प्रा. डॉ. सुभाष देशमुख, प्रा. डॉ. विजय देशमुख, प्रतीक्षा आव्हाड, शिवछत्रपती पुरस्कारप्राप्त कोमल वाकळे आदी उपस्थित होते. या स्पर्धेत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांतर्गत अहिल्यानगर, नाशिक, पुणे शहर आणि पुणे जिल्हा या चार विभागांतील संघांनी सहभाग नोंदविला. विविध वजनगटांमध्ये खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरीचे प्रदर्शन करत आपले क्रीडा कौशल्य सिद्ध केले. या स्पर्धेतून गुजरातमधील मेहसाणा येथील सकलचंद विद्यापीठात होणाऱ्या पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ वेटलिफ्टिंग स्पर्धेसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संघाची निवड करण्यात आली. स्पर्धेसाठी पंच म्हणून अनंत साने, गणेश नगिणे, राजेंद्र सोनवणे, सतीश रासकर, प्रवीण चोरमले आणि कोमल वाकळे यांनी जबाबदारी पार पाडली. स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यासाठी प्रा. डॉ. विजय देशमुख यांनी विशेष परिश्रम घेतले.

### बालभारती पाठ्यपुस्तकातील 'हिरवा वसा' कवितेबद्दल उत्तम सदाकाळ यांचा सन्मान

**जुन्नर (समर्थ गांवकरी)**

प्रसिद्ध साहित्यिक उत्तम सदाकाळ यांच्या 'हिरवा वसा' या कवितेचा समावेश इयत्ता तिसरीच्या बालभारती पाठ्यपुस्तकात झाल्याबद्दल पुणे येथील मायभूमी स्पंदन फाउंडेशन व यशोदीप पब्लिकेशन यांच्या वतीने महाराष्ट्र राज्याच्या प्राथमिक शिक्षण संचनालयाचे संचालक शरद गोसावी यांच्या हस्ते पुणे येथील नू.म.वि.मुलींचीप्रशाला सदाशिव पेठ येथे करण्यात आला.यावेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे मराठी अभ्यासक्रम मंडळाचे अध्यक्ष डॉ संदीप सांगळे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच मायभूमी स्पंदन फाउंडेशनचे अध्यक्ष अनिल गुंजाळ,बालकुमार साहित्य संस्थेचे अध्यक्ष माधव राजगुरू,लेखिका नीलिमागुंडी आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.



राष्ट्रीय शैक्षणिक धोरणा नुसार यावर्षी तिसरीच्या अभ्यासक्रमात बदलकरण्यात आलेला आहे.यावर्षीच्या पाठ्यपुस्तकात प्रसिद्ध साहित्यिक उत्तम सदाकाळ यांच्या हिरवा वसा या कविते चा समावेश करण्यात आला आहे. मढ सारख्या ग्रामीण भागात अध्यापनाचे काम करणाऱ्या उत्तम सदाकाळ यांच्या साहित्यिककामगिरीची दखल घेत याप्रसंगी त्यांचा सन्मान करण्यात आला. मनोगत व्यक्त करताना उत्तम सदाकाळ यांनी पुणे ये मायभूमी स्पंदन फाउंडेशन व यशोदीप पब्लिकेशन पुणे यांचे आभार मानले.यासंस्थांचे सामाजिक व साहित्यिक क्षेत्रा तील कार्य कौतुकास्पद आहे. त्यांनी केलेल्या सन्मानामुळे मला काम करण्यास नवी ऊर्जा व प्रेरणा मिळाली आहे.

# ज्ञानेशकुमार हे भाजपाचे निवडणूक जिंकण्याचे हत्यार : काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात

**■ दुष्काळी पंचनामा करताना दोन साक्षीदार ही शेतकऱ्यांची थट्टा**

**■ एमपीएससीच्या अध्यक्षांनी तातडीने राजीनामा द्यावा**



**संगमनेर (समर्थ गांवकरी)**

देशामध्ये आणि राज्यांमध्ये केंद्र व राज्य सरकारच्या विरोधात तरुणाईम ध्ये प्रचंड संताप निर्माण झाला आहे. एसआयआरच्या मुद्द्यावर काँग्रेस नेते खा.राहुल गांधी यांच्या प्रश्नांना निवडणूक आयोग उत्तरे देऊ शकत नाही. निवडणूक आयोग हा भाजपचे बाहुले झाला असून ज्ञानेश कुमार हे भाजपाचे निवडणूक जिंकण्याचे हत्यार असल्याची टीका काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी केली आहे .तर राज्य सरकार दुष्काळी पंचनामेंसाठी दोन साक्षीदार मागत आहे हा अत्यंत हास्यास्पद प्रकार असल्याची टीकाही त्यांनी केली आहे.

केंद्र व राज्य सरकारच्या विविध धोरणांवर माध्यमांच्या प्रतिनिधीशी बोलताना काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते तथा राज्याचे मा. महसूल व कृषिमंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, राज्यामध्ये दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली आहे आता सरकारने पंचनाम्याचा कोणताही फार्स न करता तातडीने शेतकऱ्यांना मोठी मदत केली पाहिजे.

आपणही राज्यात कृषी व महसूल मंत्री म्हणून काम केले असून त्यावेळेस शेतकऱ्यांना विनाअट मदत मिळत होती. आता दुष्काळी पंचनामे करण्यासाठी दोन शेजारच्या साक्षीदारांची आवश्यकता असल्याचे सरकारने म्हटले आहे. हा अत्यंत हास्यास्पद प्रकार आहे. शेतकऱ्याचे नुकसान झाले आहे .पाऊस नाही. पिके जळून गेली आहे. समोर दिसते आहे. शेजारच्यांना विचारायची गरज काय असा सवाल करताना शेतकऱ्यांमध्ये भांडण लावण्याचा प्रकार सरकारचा असल्याची टीका त्यांनी केली.

त्याचबरोबर ज्ञानेश कुमार यांचा वापर हा लोकशाहीचा घात करण्यासाठी भाजपकडून केला जात आहे. ते भाजपची निवडणूक जिंकण्याचे हत्यार बनले आहे. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगावर उपस्थित केलेल्या प्रश्नांवर उत्तरे देणे ही निवडणूक आयोगाचे काम आहे मात्र भाजपचे लोक त्याचे उत्तर देत आहेत. भाजप त्यांचे का समर्थन करत आहे हा मोठा प्रश्न असून एसआयआर च्या मुद्द्यावर दिल्लीमध्ये सुरू असलेल्या आंदोलनामध्ये भाजपने सुद्धा सहभागी झालं पाहिजे होते . मात्र ते निवडणूक आयोगाचे समर्थन करत आहे. निवडणूक आयोगाचा वापर करत आहे.

भाजपचा हेतू सुद्धा नाही.निवडणुकीम ध्ये वेगवेगळे फंडे वापरून सत्तेमध्ये राहायचे ही भाजपची पद्धत आहे.

राज्यामध्ये एमपीएससीच्या विद्यार्थ्यांचे मोठे आंदोलन सुरू आहे. खरे तर कायद्यापेक्षाही नैतिकतेच्या मुद्द्यावर एम पीएससीच्या अध्यक्षांनी राजीनामा दिला पाहिजे. एमपीएससीचे हे मुलं शेतकरी, शेतमजूर ,आणि बारा बलुतेदारांची मुलं आहे. हे मुलं वर्षानुवर्ष अभ्यास करतात आणि धनदांडग्याची मुले पेपर फोडून पास होतात .आणि अभ्यास करणारे नापास होतात. त्यामुळे सरकारने तातडीने एमपीएससी अध्यक्षांच्या राजीनामा घ्यावा अशी मागणी ही काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी केली आहे. त्याचबरोबर नाशिक येथून आपल्या न्याय मागण्यासाठी मुंबई येथे गेलेल्या आदिवासी विद्यार्थ्यांना दडपशाही करून अटक करण्याचा झालेला प्रकार हा अत्यंत निंदनीय आहे आदिवासी विद्यार्थ्यांच्या समस्या खूप आहेत त्या समजून घेतल्या पाहिजे, आश्रम शाळा, आदिवासी वस्तीगृहांमधील परिस्थिती, अपुऱ्या सुविधा, शिष्यवृत्तीच्या समस्या असे अनेक प्रश्न या आदिवासी युवकांची असून अत्यंत सहानुभूतीने या विद्यार्थ्यांना समजून घेणे त्यांना न्याय मिळावा अशी मागणी ही मा. शिक्षणमंत्री बाळासाहेब थोरात यांनी याप्रसंगी केली.

## सरकारी कामात अडथळा आरोपींना १ वर्ष शिक्षा प्रत्येकी ५ हजार रु दंड

**शिवनेरी (समर्थ गांवकरी)**

जुन्नर येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश एस बी शेलार यांनी आरोपी वृषाली विजय कुटे व विजय कोंडीबा कुटे रा. पिंपरी पेंढार यांनी सरकारी कामात अडथळा आणणाऱ्या आरोपींना भा . द. वि. कलम ३५३ अन्वय दोषी धरून १ वर्ष कारवास व प्रत्येकी ५ हजार रु दंड न भरल्यास ३ महिने साधा कारावास अशी शिक्षा टोटविण्यात आली आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी आहे की , आळेफाटा पोलीस स्टेशनमध्ये येऊन आरोपी वृषाली कुटे म्हणाली, माझा भाऊ यांचा अपघात झालेल्या बाबत पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल केलेला असून तपास दुपारगुडे यांच्याकडे आहे. प्रतीक शंकर हाडवळे यांची पिकप गाडी आम्हाला न विचारता कशी काय सोडवली ?.

तुम्हाला गाडी सोडवण्याचा काय अधिकार आहे ?. तसेच आरोपींची गाडी व आरोपी आत्ताच्या आत माझ्यासमोर हजर करा. नाहीतर तुम ची वाट लावते असे म्हणून पोलीस स्टेशनला हजर असलेल्या अधिकारी व अंमलदार यांना शिवगाळी दमदाटी केली.

म पो शि दिघे व म पो शि फटांगरे यांच्या अंगावर धावून येऊन त्यांना धक्काबुक्की करून शासकीय काम रोखून शासकीय कामात अडथळा निर्माण केला.

आरोपी विजय कुटे पोलीस स्टेशनच्या आवारात अंगावर पेट्रोल भरलेली बाटली उठून घेऊन आत्म हत्या करण्याचा प्रयत्न केला याबाबत आळेफाटा पोलीस स्टेशनला गुन्हा रजिस्टर दाखल झाला आहे .

याबाबतचा खटला अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश एस बी शेलार जुन्नर येथील कोर्टात घातला चालला होता सरकार पक्षातर्फे जी की खोडे अतिरिक्त जिल्हा सरकारी वकील यांनी खटल्याचे कामकाज पाहिले आहे. पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण संदीप सिंह गिल्ल , अप्पर पोलीस अधीक्षक डॉ. शुभम कुम ार, उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील , पोलीस निरीक्षक विश्वास जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली स पो नि तावरे , म पो हवा मनीषा ताम्हाणे, म पो कॉ वृषाली भोर यांनी कामकाज पाहिले आहे.

## ग्रामीण रुग्णालयात २२ बालकांवर यशस्वी शस्त्रक्रिया

**प्रहार दिव्यांग संस्थेतर्फे डॉ. कटारिया यांचे आभार**

**श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)**



श्रीगोंदा ग्रामीण रुग्णालयात अहिल्यानगर येथील नाक, कान व घसा तज्ज्ञ डॉ. कटारिया यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील २२ लहान मुलांवर यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली. ग्रामीण भागातील गरजू बालकांना त्यांच्या गावाजवळच अत्यावश्यक वैद्यकीय उपचार मि ळाल्याने पालकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. या सेवाकार्याबद्दल प्रहार दिव्यांग संस्था, श्रीगोंदा यांच्या वतीने डॉ. कटारिया यांचे आभार मानण्यात आले. ग्रामीण रुग्णालयात उपलब्ध असलेल्या आरोग्य सुविधांचा लाभ तालुक्यातील सर्वसामान्य नागरिकांसह लहान मुलांना मिळत आहे. अहिल्यानगर येथून आलेल्या डॉ. कटारिया यांनी २२ बालकांवर शस्त्रक्रिया पूर्ण करून त्यांना नवसंजीवनी दिली. ग्रामीण भागातील कुटुंबांना मोठ्या शहरांमध्ये उपचारासाठी होणारी धावपळ आणि आर्थिक खर्च यामुळे या उपक्रमाचे विशेष महत्त्व आहे.

यावेळी श्रीगोंदा ग्रामीण रुग्णालयाचे डॉ. कोल्हे, डॉ. तिवाटणे, नेत्ररोग तज्ज्ञ डॉ. राहीज, डॉ. शिंदे तसेच रुग्णालयातील कर्मचारी, सुरक्षा अधिकारी आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

# श्री सिद्धेश्वर देवस्थान ट्रस्ट निवडणुकीत ग्रामदैवत विकास पॅनलचा दणदणीत विजय

**श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)**

आढळगाव येथील तालुक्यासह जिल्हाभरात बहुचर्चित असलेल्या श्री सिद्धेश्वर देवस्थान ट्रस्ट पंचवार्षिक निवडणुकीत अत्यंत चुरशीने ग्रामदैवत विकास पॅनल ने २५ पैकी २५ जागा बहुमताने जिंकून, एक हाती सत्ता मिळवत विरोधी गटाचा पराभव केला आहे. जिल्ह्यातील देवस्थान ट्रस्ट ही पहिलीच निवडणूक असल्याचे बोलले जात होते. त्यामुळे या निवडणुकीत जिल्हाभारतातून तसेच तालुक्यातील अनेक राजकीय विश्लेषकांचे लक्ष लागले होते. त्यामुळे ही निवडणूक अत्यंत अटीतटीची व रंगतदार बनली होती. श्री सिद्धेश्वर देवस्थान ट्रस्ट पंचवार्षिक २०२६ - २०३१ या २५ जागांसाठी तब्बल ७५ उमेदवार रिंगणात उतरले होते. यामध्ये शरद जमदाडे, उत्तम राऊत यांनी ग्रामदैवत विकास पॅनल चिन्ह छत्री तर शिवप्रसाद उबाळे, अनिल ठवाळ यांनी ग्रामदैवत सेवा पॅनल चिन्ह कप - बशी तसेच महेंद्र शिंदे यांनी ग्रामदैवत नवक्रांती पॅनल चिन्ह प्रेशर कुकर असे तीन पॅनल तयार झाले होते. त्यामुळे मोठी चुरस व रंगत या निवडणुकीत भरली गेली होती. या निवडणुकीत एकूण ५ हजार ५० मतदान पैकी ३७६० मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. सरासरी ७५% मतदान यावेळी घडून आले.या निवडणुकीत २२८ मते बाद झाल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी यांनी सांगितले. सायंकाळी ६ वाजता मतमोजणीला सुरुवात होऊन, दुसऱ्या दिवशी सकाळी ७ वाजेपर्यंत मतमोजणीची प्रक्रिया शांततेच्या वातावरणामध्ये पार पडली.



ग्रामदैवत विकास पॅनल चे विजयी उमेदवार पुढीलप्रमाणे - दिपक काळाने, दत्तात्रय काळे, देविदास काळे, पांडुरंग काळे, शेखर गव्हाणे, हरिचंद्र गव्हाणे, गणेश गाढवे, पोपट जमदाडे, हरिभाऊ डाळिंबे, जिजाराम डोके, संजय डोके, संपत डोके, पांडुरंग बोळगे, शिवाजी मेहेत्रे, राहुल राऊत, मच्छिंद्र वडवकर, विजय वाकडे, सतीश वाकडे, गणेश शिंदे, नवनाथ शिंदे, बाळू शिंदे, रघुनाथ शिंदे, शरद शिंदे, अभिमन्यू ठवाळ, संदीप सूर्यवंशी हे उमेदवार छत्री या चिन्हावर विजयी झाले. या पॅनलला विजयी करण्यासाठी शरद जमदाडे, उत्तम राऊत, डॉ. अशोक वाकडे, जिजाराम डोके, देवराव शिंदे यांच्यासह सर्व सहकाऱ्यांनी खूप परिश्रम घेतले. निवडणुकीचा निकाल लागताच कार्यकर्त्यांम ध्ये उत्साहाचे व आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. यावेळी कार्यकर्त्यांनी गुलालाची उधळण करून फटाक्याची आतशबाजी करत आनंद उत्सव साजरा केला.

## रिंग रेल्वेच्या मार्गातील बदलासाठी हिरानंदानी रोडज मधील रहिवाशांची मानवी साखळी

**ठाणे (समर्थ गांवकरी)**

रिंग रेल्वेच्या मार्गात बदल करावा या प्रमुख मागणीसाठी ठाण्यातील हिरानंदानी इस्टेट येथील रोडज एन्क्लेव्ह गृहसंकुलातील रहिवासी रविवारी रस्त्यावर उतरले. यावेळी त्यांनी हातात बॅनर, होर्डिंग घेत शांततापूर्ण आंदोलन केले.

केंद्र शासनाच्या माध्यमातून ठाण्यात रिंग रेल्वे मेट्रो प्रकल्पाची उभारणी होत आहे. हिरानंदानी रोडज एन्क्लेव्ह गृहसंकुल आणि टीसीएस यांच्या मधील रस्त्यावरुन हि मेट्रो धावणार आहे. यामुळे येथील रहिवाशांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागणार आहे. आराखड्यानुसार पूर्वी टीसीएसच्या मागून कोस्टल रॅडने हि मेट्रो जाणार होती मात्र अचानक यात बदल करून ती रहिवासी भागातून धावणार आहे. यामुळे येथील नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात नाराजी आहे. या गृहसंकुलात एकूण १८ बहुमजली इमारती आहेत. यासाठी ५ मूळचे




प्रवेशद्वार आहेत. मेट्रोमुळे यातील तीन दरवाजे बंद करावे लागणार आहेत. एका प्रवेशद्वारावर एक शाळा आहे. यांमुळे दुर्देवाने एखादी दुर्घटना घडल्यास बाहेर पडण्यास रहिवाशांना मुश्किल होणार आहे.

या आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी रविवारी या गृहसंकुलातील रहिवासी मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरले. शांततापूर्ण मार्गाने यावेळी मूक आंदोलन करण्यात आले.

# जामखेड पोलिसांनी चुकीचा गुन्हा दाखल केल्याचा आरोप

**५ महिन्यांच्या बाळासह पीडित महिला व ग्रामस्थांनी रोखला जामखेड-करमाळा महामार्ग**

**जामखेड (समर्थ गांवकरी)**

नान्नज (ता. जामखेड) येथील मनीषा श्रीमंत गोरे यांच्या घरात घडलेल्या १४ लाख ६३ हजार रुपयांच्या दरोडा प्रकरणाचा पोलिसांनी योग्य तपास न करता चुकीच्या कलमांन्वये गुन्हा नोंदविल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. पोलिसांच्या या मनमानी व निष्काळजी कारभाराच्या निषेधार्थ शनिवारी (दि. ३ ऑक्टोबर) सकाळी ९ वाजेच्या सुमारास फीर्यादी व आईने आपल्या ५ महिन्यांच्या दोन चिमुकल्या बाळासह संपूर्ण कुटुंब आणि ग्रामस्थांच्या साथीने जामखेड-करमाळा राज्यमार्गावर नान्नज येथे तब्बल तीन तास तीव्र रास्ता रोको आंदोलन छेडले. अखेर पोलीस प्रशासनाने लेखी आश्वासन दिल्यानंतर हे आंदोलन मागे घेण्यात आले.

मिळालेल्या सविस्तर माहितीनुसार, शुक्रवारी (दि. २ ऑक्टोबर) रात्री दोन वाजेच्या सुमारास नान्नज येथील मनीषा गोरे यांच्या घरात अज्ञात चोरट्यांनी जबरी चोरी करत सोन्या-चांदीचे दागिने व रोकड असा एकूण १४ लाख ६३ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला होता. या घटनेनंतर फिर्यादी मनीषा गोरे तक्रार नोंदवण्यासाठी जामखेड पोलीस ठाण्यात गेल्या असता, तेथील पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक वर्षा जाधव यांनी योग्य सहकार्य केले नाही. उलटपक्षी, पीडित महिलेला म ानसिक त्रास देत, घाईगडबडीत चुकीच्या कलमांनुसार ऑनलाईन एफआयआर नोंदवून तिच्या सह्या घेतल्याचा गंभीर आरोप गोरे कुटुंब आणि ग्रामस्थांनी केला आहे.

या अन्यायाविरोधात आक्रम क झालेल्या पीडित महिला, ५ महिन्यांच्या दोन्ही जुळी बाळे, गोरे कुटुंब आणि नान्नजच्या ग्रामस्थांनी शनिवारी सकाळी नऊ वाजता जामखेड-करमाळा रस्त्यावर गोरे यांच्या घरासमोर एकत्र येत रस्त्यावरच ठिय्या मांडला. आंदोलनप्रसंगी बोलताना फिर्यादी मनीषा गोरे यांनी सांगितले की, प्रत्यक्ष घटनेच्या वेळी एकूण सहा दरोडेखोर उपस्थित होते, असे स्पष्ट सांगूनही पोलिसांनी दबावाखाली गुन्ह्यात केवळ चारच आरोपी दाखवले. एवढेच नव्हे तर तुमचे सोने कमी गेले आहे, तुम्ही जास्त का सांगता?, तुमच्याकडे एवढे सोने आले कुठून? असे प्रश्न विचारून पोलिसांनी आपल्याला वेठीस धरल्याचे आणि मानसिक त्रास दिल्याचे त्यांनी रास्तारोको आंदोलना दरम्यान सांगितले.

यावेळी नान्नजचे माजी सरपंच संतोष पवार यांनी पोलीस प्रशासनाच्या कारभारावर जोरदार हल्लाबोल केला. घडलेली घटना अत्यंत गंभीर स्वरूपाची असतानाही दरोड्याचे योग्य कलम लावले गेले नाही. पीडित महिलेवर पोलीस ठाण्यात दबाव आणून चुकीची माहिती नोंदवण्यास भाग पाडले गेले. घटनेच्या दिवशी दुपारी चार ते सहा वाजेपर्यंत पोलीस ठाण्यात एकही वरिष्ठ अधिकारी उपस्थित नव्हता. यावरून पोलिसांना या दरोड्याचे गांभीर्य नसल्याचे दिसून येते, ज्यामुळे या गुन्ह्यात



पोलिसांचे तर साटेलोटे नाही ना? असा सवालही संतोष पवार यांनी आंदोलनादरम्यान उपस्थित केला.

तीन तास चाललेल्या या मार्गावरील वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती. घटनेची माहिती मि ळताच पोलीस दल घटनास्थळी दाखल झाले. सहाय्यक पोलीस निरीक्षक अजित मोरे यांनी आंदोलकांशी आणि पत्रकारांशी संवाद साधताना सांगितले की, फिर्यादी आणि ग्रामस्थांच्या मागण्यांबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा करण्यात आली आहे. पोलिसांच्या वतीने आंदोलकांना लेखी आश्वासन देण्यात आले असून, सदर गुन्ह्याचा तपास मी स्वतः करत आहे. सर्व आरोपींचा लवकरात लवकर शोध घेऊन त्यांच्यावर कठोरात कठोर कारवाई केली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

पोलिसांच्या या लेखी आश्वासनानंतर ग्रामस्थांनी रास्ता रोको आंदोलन मागे घेतले. या आंदोलनाला नान्नज व्यापारी असोसिएशन व नान्नज ग्रामस्थ यांनी गोरे कुटुंबला पाठींबा दिला.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : अ-१, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)/
कोकण विभागीय कार्यालयाचा पत्ता : शकुंतल बिल्डिंग, गाळा क्र. २, सेक्टर ५, कोपरखैरणे, नवी मुंबई ४००७०९

# जामखेडमध्ये विक्रम साराभाई इस्त्रो सहल परीक्षेत सावळागोंधळ

## पारदर्शक चौकशीसाठी विद्यार्थी-पालकांचे प्रशासनाला साकडे

**जामखेड (समर्थ गांवकरी)**

विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन वाढीस लागावा, विज्ञान व संशोधनाची आवड निर्माण व्हावी तसेच कुतूहल आणि शोधवृत्ती जोपासली जावी या उद्देशाने डॉ. विक्रम साराभाई स्पेस सेंटर, थुंबा (केरळ) येथे शैक्षणिक इस्त्रो सहलीचे आयोजन करण्यात आले आहे. याच आनुशंगाने अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाच्या वतीने या सहलीसाठी रविवारी जिल्ह्यातील ३६ केंद्रांवर निवड चाचणी परीक्षा घेण्यात आली. मात्र, जामखेड तालुक्यातील जाम खेड केंद्रावर या परीक्षेत मोठा गैरप्रकार झाल्याचा गंभीर आरोप घोडेगाव येथील परीक्षार्थी विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थांनी केला आहे. याप्रकरणी संबंधित परीक्षेची सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे शिक्षणाधिकारी व गटशिक्षणाधिकारी यांच्याकडे करण्यात आली आहे.

मिळालेल्या सविस्तर माहितीनुसार, सदर शैक्षणिक सहलीसाठीची निवड परीक्षा रविवार, ४ ऑक्टोबर २०२६ रोजी पार पडली. जामखेड येथील ल. ना. होशिंग विद्यालय या परीक्षा केंद्रावर ब्लॉक क्रमांक १५ मध्ये घोडेगाव येथील प्रांजल शंकर भोंडवे, सोनम राजू शेख, सनम इक्बाल सय्यद आणि प्राजक्ता गणेश नलवडे हे विद्यार्थी परीक्षेसाठी बसलेले होते. परीक्षा सुरू असताना या ब्लॉकवर पर्यवेक्षक म्हणून नियुक्त असलेल्या एका महिला शिक्षिकेने एका विद्यार्थ्याला जाणीवपूर्वक सर्व प्रश्नांची उत्तरे सांगितल्याचा आरोप विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांनकडे केला आहे. पर्यवेक्षकांच्या या पक्षपाती व्यवहारामुळे वर्गातील इतर मेहनती विद्यार्थ्यांवर प्रचंड अन्याय झाला असल्याची भावना व्यक्त होत आहे. दरम्यान, संबंधित विद्यार्थ्याचे आई-वडील हे स्वतः शिक्षक असल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळेच संबंधित पर्यवेक्षक मॅडम यांनी या विद्यार्थ्याला झुकते माप देत उत्तरे सांगितली का?, किंवा यामागे काय कटकारस्थान आहे, असा संशय आता व्यक्त केला जात आहे. या संपूर्ण प्रकरणाची गंभीर दखल घेऊन सदर ब्लॉक क्रमांक १५ मध्ये बसवण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे (CCTV) फुटेज तात्काळ तपासावे आणि दोषी पर्यवेक्षक शिक्षिकेवर योग्य ती कायदेशीर व प्रशासकीय कारवाई करावी, अशी आक्रमक भूमिका घोडेगाव येथील ग्रामस्थांनी घेतली होती.



याच आनुशंगाने घोडेगाव येथिल ग्रामस्थांनी व पालकांनी जामखेड चे गटशिक्षणाधिकारी धनंजय बोंदार्डे यांची भेट घेऊन निवेदन दिले. संबंधित शाळेच्या ब्लॉक मधिल सीसीटीव्हीची तपासणी करण्याची मागणी केली. यानंतर संबधित पालकांनी देखील स्वतःहून शाळेत जात सीसीटीव्ही कॅमेरा तपासल्यावर संबंधित ब्लॉक मधिल शिक्षिका ही एका विद्यार्थीच्या बॅंन्च जवळ बसुन विद्यार्थीशी चर्चा करताना दिसुन आले आहे.

शिक्षणाधिकारी व गटशिक्षणाधिकारी यांना दिलेल्या या निवेदनावर अन्यायग्रस्त विद्यार्थी, त्यांचे पालक आणि घोडेगावच्या ग्रामस्थांच्या सह्या आहेत. आता याप्रकरणी शिक्षण विभाग काय कारवाई करतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. निवेदन देतावेळी महादेव बाळासाहेब भोंडवे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष लक्ष्मण बलभीम भांगे, माजी सरपंच शरद भास्कर जगताप, पालक मुकुंद बाळासाहेब भोंडवे व आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

> इस्त्रो सहलीच्या आनुशंगाने घेण्यात आलेली परीक्षेत बाबत पालक व ग्रामस्थांची तक्रार आली होती. याच तक्रारीच्या अनुशंगाने परीक्षा केंद्रावर सीसीटीव्ही कॅमेरे तपासण्यात आले. प्राथमिक चौकशीत गैरप्रकार दिसुन आला आहे. दोन दिवसात संबंधित जे शिक्षक असतील त्यांना नोटिसा बजावण्यात येणार आहेत. चौकशी करुन एका आठवड्यात कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल.
>
> **- धनंजय बोंदार्डे, गटशिक्षणाधिकारी, जामखेड**

# 'स्वच्छता ही सेवा २०२६' अभियानांतर्गत ठाणे जिल्ह्यात महा श्रमदान दिन उत्साहात

## कारिवली ग्रामपंचायतीत संत गाडगेबाबांच्या प्रतिमेचे पूजन करून स्वच्छता उपक्रमांना सुरुवात

**ठाणे (समर्थ गांवकरी)**

'स्वच्छता ही सेवा २०२६' अभियानांतर्गत १ ऑक्टोबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या 'महा श्रम दान दिना'निमित्त भिवंडी तालुक्यातील कारिवली ग्रामपंचायतीमध्ये विविध स्वच्छता व जनजागृतीपर उपक्रम ंचे आयोजन करण्यात आले. संत गाडगेबाबांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी उपस्थित मान्यवर, ग्रामपंचायत पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी, महिला बचत गटांच्या सदस्यांसह ग्रामस्थांनी स्वच्छतेची शपथ घेतली. स्वच्छता ही केवळ अभियानापुरती मर्यादित न राहता ती प्रत्येक नागरिकाची दैनंदिन जबाबदारी असल्याचा संदेश यावेळी देण्यात आला.

महा श्रमदान दिनानिमित्त ग्राम पंचायत परिसरातील सफाई कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. ग्रामपंचायतीच्या माध्यमातून गावाच्या स्वच्छतेसाठी सातत्याने योगदान देणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांचा सेवा सन्मान करून त्यांच्या कार्याची दखल घेण्यात आली. तसेच सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता, परिसर साफसफाई आणि वृक्षारोपण असे विविध उपक्रम राबविण्यात आले.

या कार्यक्रमास पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी पंडित राठोड, भिवंडी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी गोविंद खामकर, विस्तार अधिकारी (पंचायत) राजू भोसले, सरपंच, महिला बचत गटांच्या सदस्या, ग्रामपंचायत पदाधिकारी व कर्मचारी, गावातील नागरिक, शिक्षक, विद्यार्थी आदी उपस्थित होते.

यावेळी उपस्थितांनी स्वच्छता, आरोग्य आणि पर्यावरण संवर्धनाबाबत सामूहिक सहभागाचे महत्त्व अधोरेखित केले. गावातील सार्वजनिक ठिकाणे स्वच्छ ठेवणे, कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावणे, परिसर स्वच्छ व सुंदर ठेवणे तसेच वृक्षसंवर्धन करणे यासाठी नागरिकांनी नियमितपणे पुढाकार घ्यावा, असे आवाहन करण्यात आले.





'स्वच्छता ही सेवा २०२६' अभियानांतर्गत ठाणे जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये १ ऑक्टोबर रोजी विविध स्वच्छता उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. ग्रामपंचायत परिसर, सार्वजनिक ठिकाणे, रस्ते, चौक, शाळा परिसर, पाणीपुरवठा स्त्रोत परिसर आदी ठिकाणी श्रमदान व स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

ग्रामस्थ, लोकप्रतिनिधी, महिला बचत गट, विद्यार्थी, शिक्षक, ग्राम पंचायत कर्मचारी आणि विविध घटकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. 'एक दिवस, एक तास, एक साथ' या भावनेतून नागरिकांनी स्वच्छता उपक्रमात सहभागी होत स्वच्छ, सुंदर व निरोगी गाव निर्मितीचा संकल्प केला. स्वच्छता ही केवळ एका दिवसाची मोहीम नसून ती सातत्याने जपण्याची सामूहिक जबाबदारी आहे. प्रत्येक नागरिकाने आपल्या गावाच्या स्वच्छतेसाठी योगदान दिल्यास स्वच्छ व निरोगी ग्रामपरिसर निर्माण होण्यास निश्चितच मदत होईल, असा संदेश या अभियानातून देण्यात आला.

# ज्ञान, सेवा आणि संस्कारांचा मंगलमय गौरव





**जुन्नर (समर्थ गांवकरी)**

रॉयल एज्युकेशन अँड रिसर्च सेंटर, ओतूर संचलित 'रॉयल एज्युकेशन इंग्लिश स्कूल'च्या प्रांगणात आज एक अत्यंत दैदिप्यमान व स्नेहाद्र सोहळा संपन्न झालाज्ञानदीप पाजळणाऱ्या आमच्या या ज्ञान मंदिरात आज कर्तृत्वाचा तेजस्वी सूर्य व समाजसेवेचा वाहता झरा एकत्र अवतरले होते ज्यांचे आयुष्यच ज्ञानाची साधना,साहित्याची सेवाआणि विचारांची समृद्धी आहे,असे आदरणीय,गुणवंत,ज्ञानवंत, बुद्धिवंत,किर्तिवंत,रसिकवंत, चरित्र्यवंत,विचारवंत आणि कलावंत ज्येष्ठ साहित्यिक डॉ. खं. रा. म ाळवे (आपले लाडके खंरमा सर) तसेच निष्काम कर्मयोगाने समाजसेवेचा आदर्श निर्माण करणारे, वंदनीय गाडगे मिशन संस्था, ओतूर येथील उपक्रमशील समाजसेवक सन्माननीय रणजित पवार यांचा आमच्या संस्थेच्या वतीने अत्यंत भाव पूर्ण वातावरणात सत्कार करण्यात आला.

विशेष आनंदाची आणि अभिमानाची गोष्ट म्हणजे, आदरणीय माळवे सर यांना उद्या दिल्ली येथे आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठित 'शांतिदूत पुरस्काराने सन्मानितकरण्यात येत आहे त्यांच्या याअलौकिक यशामुळे ओतूरच्या व संपूर्ण महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे अशा महान व्यक्तिमत्त्वा चा सत्कार करण्याचे परम भाग्य आमच्या संस्थेला लाभले, हा आमचा महद्भाग्य योगच!हा सत्कार सोहळा संस्थेचे संस्थापक सन्माननीय डॉ. चंद्रशेखर वलवणकर, आत्मारामजी जगताप, रामदास तांबे,शाळेच्याप्राचार्या सुजाता कासार आणि शाळा समन्वयक.परिघा बेनकेयांच्या शुभहस्ते व उपस्थितीत अत्यंत मंगलमय वातावरणात पडला.

# डॉ. जयश्रीताई थोरात यांनी मुंबईत आदिवासी विद्यार्थ्यांच्या उलगुलान मोर्चाला दिला पाठिंबा

## आदिवासी विद्यार्थ्यांना तातडीने न्याय द्या : डॉ जयश्रीताई थोरात

**संगमनेर (समर्थ गांवकरी)**

आपल्या विविध मागण्यांसाठी ४० दिवसांहून अधिक काळ आंदोलन करूनही अपेक्षित दखल न घेतल्याने नाशिक जिल्ह्यातील आदिवासी विद्यार्थ्यांनी २८ सप्टेंबर पासून मुंबईच्या दिशेने उलगुलान हा मोर्चा सुरू केला आहे .सरकारने या विद्यार्थ्यांची दखल न घेता दडपशाही करून त्यांना अटक करण्याचा प्रयत्न केला आहे. याचा निषेध करत या आदिवासी विद्यार्थ्यांच्या न्याय मागण्या तातडीने मंजूर करा अशी आग्रही मागणी संगमनेर तालुका युवक काँग्रेसच्या अध्यक्षा डॉ. जयश्रीताई थोरात यांनी केली असून त्यांनी मुंबईमध्ये या विद्यार्थ्यांची भेट घेऊन त्यांना पाठिंबा दिला.

मुंबई येथे आदिवासी विद्यार्थ्यांच्या उलगुलान मोर्चासाठी आलेल्या सर्व विद्यार्थ्यांची अत्यंत आस्तेवाईकपणे चौकशी करत या विद्यार्थ्यांना डॉ जयश्रीताई थोरात यांनी पाठिंबा दिला. याचबरोबर सरकारने विद्यार्थ्यांबाबत घेतलेल्या दडपशाहीच्या भूमिकेचा त्यांनी निषेध केला. यावेळी डॉ. जयश्रीताई थोरात म्हणाल्या की, आदिवासी विभागाच्या विविध प्रलंबित मागण्यासाठी ४० दिवसांपेक्षा अधिक काळ या विद्यार्थ्यांनी आंदोलन केले. मात्र सरकारने याकडे दुर्लक्ष केले म्हणून आपल्या मागण्यांसाठी हे विद्यार्थी १७० किलोमीटरची पायपीट करून मुंबईमध्ये पोहोचले. तरीही त्यांची कोणतीही दखल घेतली नाहीा उलट ते रात्री काँग्रेस कार्यालयात झोपले असताना मध्यरात्री त्यांना दडपशाही करून अटक करण्याचा प्रयत्न करण्यात आला हे अत्यंत निंदनीय आहे.

आदिवासी आश्रम शाळा व वस्तीगृहांम धील शिक्षण व्यवस्था, विद्यार्थ्यांना मि ळणाऱ्या अपुरा सुविधा, भोजन व्यवस्था आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसंबंधित विविध प्रश्नांकडे सरकारचे लक्ष वेधणे हा या आंदोलनाचा उद्देश आहे. काही दिवसापूर्वी सर्पदंशामुळे गडचिरोली जिल्ह्यातील ३ मुली मृत्युमुखी पडल्या. मात्र सरकारने फक्त घोषणाबाजी केली. प्रत्यक्षात कृती केली नाही .यामुळे या विद्यार्थ्यांनी आपल्या न्याय म ागण्यासाठी आंदोलन सुरू केले. लोकशाहीम ध्ये न्याय मार्गाने आंदोलन करणे हा मूलभूत अधिकार आहे.

> **माजी शिक्षण मंत्री बाळासाहेब थोरात यांनीही आदिवासी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला पाठिंबा दिला**
>
> नाशिक जिल्ह्यातून मुंबईकडे जात असलेल्या युवकांना काँग्रेस कार्यालयाम धून अटक करण्याचा प्रयत्न झाला .त्याचबरोबर दडपशाही करण्याचा प्रयत्न झाला या घटनेचा निषेध करून महाराष्ट्र काँग्रेसचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी सुद्धा सरकारच्या धोरणांवर टीका करत विद्यार्थ्यांच्या भावना समजून घेत त्यांच्याशी संवाद साधा असे आवाहन केले. यानंतर राज्यभरात माध्यमांनी या घटनेची दखल घेतली. त्यानंतर डॉ जयश्रीताई थोरात यांनी तात्काळ मुंबई येथे जाऊन या विद्यार्थ्यांची भेट घेतली. आपण विद्यार्थ्यांसमवेत आहोत असा विश्वास दिला

# न्याय हक्कासाठी लढणाऱ्या आदिवासी युवकांना अटक करणे दुर्दैवी : मा. महसूल मंत्री बाळासाहेब थोरात

## आदिवासी युवकांच्या न्याय मागण्या चर्चेने सोडवा

**संगमनेर (समर्थ गांवकरी)**

नाशिक जिल्ह्यातील आदिवासी युवक हे आपल्या न्याय मागण्यासाठी मुंबईकडे प्रवास करण्यासाठी पोहोचत आहे. या आदिवासी गरीब विद्यार्थ्यांच्या मागण्या समजावून घेऊन त्यांच्या मागण्या सोडवणे विद्यार्थ्यांचे समाधान करणे ही सरकारची जबाबदारी आहे. मात्र आदिवासी विद्यार्थ्यांमध्ये दहशत आणि दडपशाही निम ाण करून त्यांना अटक करणे हे अत्यंत दुर्दैवी असल्याची टीका काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते तथा राज्याचे माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केली आहे.

नाशिक वरून निघालेल्या विद्यार्थ्यांना परवानगी नाकारणे व काँग्रेस प्रदेश कार्यालयामध्ये झोपलेल्या विद्यार्थ्यांना अटक केल्यानंतर प्रतिक्रिया देताना ते संगमनेर येथे बोलत होते.

यावेळी बोलताना मा शिक्षण व महसूल मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की आपल्या न्याय मागण्या सरकारकडे मागणी हा प्रत्येकाचा हक्क आहे.

नाशिक जिल्ह्यातील विविध तालुक्यांमधील आदिवासी युवक हे त्यांच्या मागण्यांसाठी मुंबईकडे प्रवास करत आहेत. आणि जे काही मुंबईमध्ये पोहोचले आहे. त्यांना आझाद मैदानाची परवानगी नाकारली गेली आहे. त्या ठिकाणी त्यांना अटक करण्यात आली आहे असे समजते.

जे मुंबईकडे वाटचाल करत आहेत .ते युवक काँग्रेस कार्यालयात झोपलेले असताना त्यांना मध्यरात्री अटक करून दमदाटी केली जाते व त्यांच्यावर दहशत निर्माण करणे हे अत्यंत दुर्दैवी आहे.

विद्यार्थ्यांच्या न्याय मागण्यांच्या बाबत सरकारने त्यांच्याबरोबर चर्चा केली पाहिजे .त्यांच्या मागण्या सोडवल्या पाहिजे. तरुणांचे समाधान केले पाहिजे. मात्र युवकांना आपल्या न्याय मागण्या मागण्याची परवानगी नाकारणे हे अत्यंत वाईट आहे.

हे युवक गोरगरीब आदिवासी भागातील असून या सर्व विद्यार्थ्यांच्या मागण्या समजून घेतल्या पाहिजे. मात्र आदिवासी गोरगरिबांच्या



मागण्या समजून घेण्याची सरकारची तयारी नाही. उलट या तरुणांवर दहशत निर्माण केली जात असून ती अत्यंत निषेधार्य असल्याचे काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी म्हटले आहे. त्याचबरोबर या युवकांच्या मागण्या समजून घेऊन त्या मान्य कराव्या अशी मागणी सरकारकडे केली आहे.

# शेतक-यांना सरसकट दुष्काळ निधी देऊन ऊस पिकाचे ही पंचनामे करा : रयत शेतकरी संघटनेची मागणी

**नेवासा (समर्थ गांवकरी)**

नेवासा तालुक्यातील बिकट परिस्थितीमुळे शेतक-यांना सरसकट दुष्काळ निधी मिळावा तसेच ऊस पिकाचे पंचनामे करण्यात यावे अशी मागणी राष्ट्रीय अध्यक्ष अँड.बापूसाहेब देशमुख यांच्या रयत शेतकरी संघटनेच्या वतीने नेवासा तहसीलदार यांना देण्यात आलेल्या निवेदनात करण्यात आली आहे.

तहसीलदार डॉ.संजय बिरादार व अप्पर तहसीलदार सोनाली मात्रे यांना दिलेल्या निवेदनात रयत शेतकरी संघटनेच्या जिल्हा व तालुका पदाधिकाऱ्यांनी म्हटले आहे की चालु वर्षामध्ये नेवासा तालुक्यात बिकट दूष्काळ परिस्थिती निर्माण झाली आहे. पाऊस नसल्यामुळे खरीपाची पिके हाताची गेली असून रब्बीच्यापेरण्यादेखील संकटात सापडल्या आहेत. शेतातील उभी पिके जळून खाक झाली आहेत.

पिकाचे अतोनात नुकसान झाल्यामूळे शेतकरी आर्थीक अडचणीत सापडला असून त्याच्यावर उपासमारीची वेळ आली आहे.

जनावराच्या चा-याची व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न दिवसेदिवस गंभीर होत चालला आहे.अशा अत्यंत बिकट परिस्थितीत शासनाकडून आर्थीक म दतीची गरज आहे.

मात्र अदयापपर्यंत कोणतीही ठोस मदत मिळालेली नाही,शेतमजुरांना देखील हाताला काम नसल्यामुळे तो कमालीचा आर्थीक अडचणीत सापडलेला आहे. त्याना देखील शासकीय मदत मिळावी असे निवेदनात स्पष्ट केले आहे

नेवासा तालुक्यातील परिस्थिती पाहता कोणत्याही जाचक अटी न लावता सरसकट पंचनामे करून दूष्काळ निधी आर्थीक मदखद्ध त्वरीत मंजुर करण्यात यावा,

तालुक्यातील नगदी व मुख्य पिक असलेले ऊस पीक पाण्याअभावी जळुन गेले आहे. त्यामुळे ऊस पिकाचा विशेष समावेश करून त्याचे तातडीने पंचनामे करावेत व ऊस उत्पादक शेतक-यांना हेक्टरी भरीव मदत मिळावी.

शेतक-याचे चालू वर्षाचे पिक कर्ज पुर्णपणे माफ करण्यांत यावे,तालुक्यांत जनावरासांठी चारा छावण्या सुरु करण्यात याव्यात,शेतक-यांना आहे त्या पाण्यासाठी व जनावरांच्या चा-यासाठी पिक उभे राहण्यासाठी पूर्ण क्षमतेने लाईट देण्यांत यावी

शेतकरी व शेतमजुर यांच्या मुलांचे चालु वर्षाचे शैक्षणीक शुल्क पूर्णपणे माफ करण्यात यावे या मागणी चा तातडीने व गांर्भीयाने विचार करून शासनाकडे सकारात्मक शिफारस करावी व नेवासा तालुक्यातील शेतक-याना न्याय मिळवून दयावा अन्यथा रयत शेतकरी संघटना व शेतकरी बांधवाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यांत येईल असा ईशारा ही दिलेल्या निवेदनात देण्यात आला आहे

सदरचे निवेदन नेवासा तालुक्याच्या अप्पर तहसीलदार सोनाली मात्रे यांना देण्यात आले.यावेळी अँड.बापूसाहेब देशमुख यांच्या रयत शेतकरी संघटनेचे



अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष बबनराव कोरडे,जिल्हा उत्तर उपाध्यक्ष विशाल वरकड,जिल्हा संपर्क प्रमुख सरपंच बाळासाहेब येडूदादा कोरडे,जिल्हा प्रवक्ता अनिल पटारे,नेवासा तालुकाध्यक्ष संजय वरखडे,जिल्हा ओबीसी अध्यक्ष गणेश सोनवणे,तालुका उपाध्यक्ष मारुती मुरदरे,जिल्हा महिला आघाडी अध्यक्षा अनिता अनिल पटारे,तालुका संपर्क प्रमुख असिफ पठाण उपस्थित होते